महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

● संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: ३२, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार ५ नोव्हेंबर २०२४ ते सोमवार ११ नोव्हेंबर २०२४ ● POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 ● RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# पोलिसांच्या मेहनतीची सरकारलाच किंमतच नाही

## विशेष सुरक्षेसाठीचे तब्बल ७ कोटी रुपये थकित

■ मुंबई : विशाल कारंडे

**अनेक व्हीआयपी व्यक्ती, संस्था, महत्त्वाच्या कारवाया, सरकारी कार्यक्रमांचा बंदोबस्त अशा वेगवेगळया गोष्टींसाठी मुंबई पोलिसांकडून विशेष सुरक्षेची मागणी केली जाते. शहराची सुरक्षा व कायदा-सुव्यवस्थेची सर्वात महत्त्वाची जबाबदारी असूनही मुंबई पोलीस प्रचंड ताण सहन करून ही सुरक्षा पुरवतात देखील.**

मात्र, खुद्द सरकारकडूनच मुंबई पोलीस विभागाच्या मेहनतीचा परतावा मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. इंडियन एक्स्प्रेसनं दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जाद्वारे यासंदर्भातला खुलासा झाला आहे. राज्य सरकारच्या विविध विभागांकडून वेगवेगळ्या कारवाया किंवा व्हीआयपी व्यक्तींसाठी पोलिसांकडून विशेष सुरक्षेची मागणी केली जाते. यामध्ये खुद्द राज्य सरकार किंवा त्यांच्या इतर विभागांच्या कार्यक्रम वा कारवायांना ही सुरक्षा पुरवली जाते. यासाठी पोलीस दलाकडून निश्चित अशा मूल्याची मागणी केली जाते. शासनानं निर्धारित केलेल्या निकषांनुसारच हे दर आकारले जातात. मात्र, गेल्या ७ वर्षांत मुंबई पोलिसांनी पुरवलेल्या अशाच विशेष सुरक्षेसाठीचे तब्बल ७ कोटी रुपये थकित असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माहिती अधिकारातून समोर आलेल्या माहितीनुसार, शासनाच्या एकूण १४ विभागांकडून या विशेष सुरक्षेसाठीचे तब्बल ७ कोटी १० लाख ६७ हजार २५२ रुपये थकित आहेत यामध्ये सर्वाधिक वाटा हा प्राप्तीकर विभागाचा असून त्यांच्या विविध ठिकाणी टाकण्यात आलेल्या छाप्यांसाठी ही विशेष सुरक्षा पुरवण्यात आली होती. त्याशिवाय या यादीमध्ये मुंबई मेट्रोपोलिटन डेव्हलपमेंट अथॉरिटी अर्थात MMRDA, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,



फोर्टमधील जनरल स्टम्प ऑफिस अशा विविध शासकीय संस्थांचा समावेश आहे. करचुकवेगिरीमुळे इतरांना डिफॉल्टर घोषित करणारा प्राप्तीकर विभागत मुंबई पोलिसांचा सर्वात मोठा 'डिफॉल्टर' ठरला आहे. कारण थकित ७ कोटींच्या रकमेपैकी एकट्या प्राप्तीकर विभागाचेच ४ कोटी ८५ लाख रुपये थकित आहेत. गेल्या सहा वर्षांत प्राप्तीकर विभागानं टाकलेल्या वेगवेगळ्या छाप्यांसाठी पुरवलेल्या विशेष सुरक्षेचाही यात समावेश आहे. प्राप्तीकर विभागापाठोपाठ एमएमआरडीएकडे मुंबई पोलिसांचे १ कोटी ११ लाख रुपये थकित आहेत. २०१७ सालापासून या विभागाला पोलिसांनी पुरवलेल्या विशेष सुरक्षेचे हे पैसे आहेत. त्यानंतर आरबीआय तिसऱ्या क्रमांकावर असून RBI कडे मुंबई पोलिसांचे ४५ लाख ७१ हजार रुपये थकित आहेत. एका वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्याने इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार या सर्व यंत्रणांना आधी विशेष सुरक्षेची मागणी करण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्तांना विनंती अर्ज द्यावा लागतो. त्यानंतर ती विनंती पोलीस उपायुक्तांकडे पाठवली जाते. पोलीस आयुक्तांच्या वतीने नंतर पोलीस उपायुक्त त्या विनंती अर्जाची तपासणी करतात, चौकशी करतात आणि त्यातून आलेल्या निष्कर्षांच्या आधारे 'लोकल आर्म्स डिपार्टमेंट'ला संबंधित यंत्रणा वा व्यक्तींना सुरक्षा पुरवण्याचे आदेश दिले जातात.

## संक्षिप्त

### पोलिसांना नेमलेलेच काम द्या, उच्च न्यायालयाचे आदेश

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

अवैध बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पुरविण्यात आलेले पोलीस बळ इतर कुठल्याही कामाकरता वापरू नये असे आदेश, उच्च न्यायालयाने नवी मुंबई पोलिसांना दिल्याचे समोर आले आहे. यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पुरविण्यात आलेला पोलीस



ताफा पुरत नाही. त्यामुळे आता जे पोलीस कारवाईसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत, त्यांना अन्य कोणतेही काम देऊ नका. खुपच आवश्यकता असेल तर त्यांना दुसरे काम द्या, असे आदेश मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने दिले आहेत. नवी मुंबईच्या पालिकेसाठी ७८ पोलिसांचे पथक बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यासाठी नेमण्यात आले आहे. त्यापैकी फक्त २८ पोलीस पालिकेसोबत कार्यरत असतात. तसेच आठ वॉर्डमध्ये कारवाई करताना इतकेच पोलीस पुरेसे नाहीत. कधी-कधी परिस्थिती हाताबाहेर जाते, असे असतानाही उपलब्ध पोलिसांपैकी काही जणांना उत्सवाचा बंदोबस्त किंवा अन्य कामे दिली जातात, असे पालिकेने खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिले आहे. (शेष पृष्ठ २ वर)

### उत्तराखंडमध्ये मोठी दुर्घटना, बस दरीत कोसळली, २५ जणांचा मृत्यू

■ उत्तराखंड : वृत्तसंस्था

उत्तराखंड मधील अल्मोड येथे मोठी दुर्घटना घडली आहे. ३५ प्रवाशांना घेऊन जाणारी बस दरीत कोसळली आहे. या अपघातामध्ये २५ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. अपघाताची माहिती मिळताच बचाव पथकं आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सध्या बचावकार्य वेगाने सुरु आहे. अल्मोडामध्ये मार्चुला जवळ दरीमध्ये प्रवासी



बस कोसळली. या अपघातामध्ये अनेकांचा मृत्यू झाल्याचं समजतेय. या बसमध्ये ३५ जण प्रवास करत होते. घटनास्थळावर सध्या बचावकार्य वेगात सुरु आहे. एनडीआरएफचे पथकही घटनास्थळी दाखल झालेय. मिळालेल्या माहितीनुसार, नैनी डांडा येथून बस रामनगरकडे जात होती. चालकाला अंदाज न आल्यामुळे सकाळी बस दरीत कोसळली. गीत जागीर नदीच्या किनाऱ्याला बस दरीत कोसळल्यामुळे अनेकजणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत २५ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आलेय.

## विवेक फणसाळकर यांच्याकडे राज्याच्या पोलिस महासंचालकपदाचा कार्यभार

■ मुंबई : यश सावंत

महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालक पदावरून आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली आहे. काँग्रेसपाठोपाठ शिवसेनेनेही (उद्धव ठाकरे) शुक्ला यांना



पोलिस महासंचालकपदावरुन हटविण्यासाठी मागणी केली होती. त्यातच निवडणूक आयोगाकडून राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ल यांची बदली करण्याचा निर्णय घेतला. पण आता त्यांच्या जागी मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे पोलिस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. विवेक फणसाळकर हे १९८९ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी आत्तापर्यंत अनेक मोठमोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. काही महिन्यांपूर्वीच मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी त्यांची नेमणूक झाली आहे. त्यापूर्वी ते महाराष्ट्र पोलिस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाचे संचालक होते. ठाणे पोलिस आयुक्तपदावरुन मे २०२१ मध्ये त्यांची या ठिकाणी बदली झाली. याशिवाय, २०१६-२०१८ या कालावधीत फणसळकर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अतिरिक्त पोलिस महासंचालक म्हणून पदभार सांभाळला होता. संवेदनशील समजल्या जाणाऱ्या दहशतवाद विरोधी पथकाचेही ते प्रमुख होते. काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांनी यापूर्वी निवडणूक आयोगाला पत्र लिहून डीजीपी रश्मी शुक्ला यांना हटवण्याची मागणी केली होती. पटोले यांनी त्यांच्या निःपक्षपातीपणावर प्रश्न उपस्थित केले होते. याचदरम्यान आता निवडणूक आयोगाकडून राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ल यांची बदली करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत, मात्र पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या बदलीबाबत काँग्रेसकडून अडथळे निर्माण केले जात आहेत. २० नोव्हेंबरपूर्वी त्यांची बदली करण्याची विनंती काँग्रेसने केंद्रीय निवडणूक आयोगाला केली आहे. ते वादग्रस्त अधिकारी असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. रश्मी शुक्ला यांच्या बदलीसाठी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आयोगाला पत्रही पाठवले होते.



## मनोज जरांगेंकडून विधानसभा निवडणुकीतून माघार, एकही उमेदवार उभा करणार नाही

■ जालना : सतिश सोनावणे

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीत माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून विधानसभा निवडणूक लढवण्यावर जरांगे यांच्याकडून चर्चा केली जात होती. त्यांनी ३ ऑक्टोबर रोजी कोणकोणत्या मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवणार, याची माहिती दिली होती. तसेच कोणत्या जागेवरील उमेदवार पाडण्याचे काम करायचे याबाबतही त्यांनी सांगितले होते. त्यानंतर आज जरांगे यांनी आज मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यांनी एकाही जागेवर उमेदवार उभा न करण्याचा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी आज विधानसभा निवडणुकीसंदर्भात आपली भूमिका जाहीर केली. 'आम्ही रात्री साडेतीनपर्यंत चर्चेला बसलो होतो. आम्ही या निवडणुकीत मित्रपक्षांसोबत दलित आणि मुस्लीम उमेदवार उभे करणार होतो. कारण, एका जातीच्या जोरावर निवडणूक लढणे आणि जिंकणे शक्य नाही. आम्ही राजकारणात नवखे आहोत. उमेदवार उभा करुन तो पडला तर जातीची लाज जाईल. त्यामुळे आम्ही विधानसभा निवडणूक लढवायची नाही, असा निर्णय घेतला. त्यामुळे माझी सगळ्या मराठा उमेदवारांना विनंती आहे की, सगळ्यांनी आपापले उमेदवारी अर्ज मागे घ्यावेत. निवडणूक हा काही आपला खानदानी धंदा नाही. एका जातीच्या जोरावर निवडणूक जिंकणे शक्य नाही. एका जातीवर पुढे जाणे शक्य नाही, हे एकमताने ठरवण्यात आले. (शेष पृष्ठ २ वर)

## 'मला निवडणूक लढवावीच लागेल', सदा सरवणकर हतबल; म्हणाले, 'राज ठाकरेंनी माझी...'

■ मुंबई : सम्यक कासारे

मुंबईतील माहीम विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. महायुतीतील मोठा पक्ष असलेल्या भाजपाने अमित ठाकरे यांना या मतदारसंघात पाठिंबा दिला आहे. भाजपा नेते दादर-माहीममध्ये अमित ठाकरेंचा प्रचार करणार असल्याचं पक्षातील अनेक नेत्यांनी स्पष्ट केलं आहे. दरम्यान, शिवसेनेने (शिंदे) येथील विद्यमान आमदार सदा सरवणकर यांना माहीममधून उमेदवारी दिली आहे. दरम्यान, सरवणकरांनी आपला उमेदवारी अर्ज मागे



घ्यावा यासाठी भाजपा व मनसेने दबाव निर्माण केला होता. मात्र, सरवणकरांनी त्यांचा अर्ज मागे घेतलेला नाही. दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत देण्यात आली होती. मात्र, सरवणकरांनी आपला अर्ज मागे घेतलेला नाही. सदा सरवणकर यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली, यावेळी ते म्हणाले, 'राज ठाकरे यांना भेटण्यासाठी माझा मुलगा समाधान व आमचे इतर चार पदाधिकारी त्यांच्या घरी गेले होते. त्यांनी राज ठाकरे यांच्याकडे भेटीसाठी वेळ मागितली. तसेच त्यांनी सांगितलं की माझे वडील देखील राज ठाकरे यांना भेटू इच्छितात. (शेष पृष्ठ २ वर)

## कांदिवली औद्योगिक वसाहत ११६ एकर भूखंड परत घेण्याच्या आदेशाला उच्च न्यायालयाकडून स्थगिती

■ मुंबई : विशाल कारंडे

कांदिवली पश्चिम येथील चारकोप परिसरातील सुमारे ११६ एकर भूखंड कांदिवली औद्योगिक वसाहतीला ज्या प्रयोजनाऐवजी वितरित करण्यात आला होता त्याऐवजी व्यावसायिक वापर होत असून मूळ भूखंडांची परस्पर विक्री केल्यामुळे शासनाचा अनर्जित रक्कमेपोटी मोठा महसूल बुडाल्याचे निदर्शनास आल्याने अखेर राज्य शासनाने हा भूखंड परत घेण्याचे आदेश जारी केले आहेत. मात्र या आदेशाविरुद्ध कांदिवली सहकारी औद्योगिक वसाहत या संस्थेने उच्च न्यायालयात आव्हान दिले असून न्यायालयाने तूर्त या



शासन निर्णयाला स्थगिती दिली आहे. आता या प्रकरणी ३ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## गोपाळ शेट्टींची निवडणुकीच्या रिंगणातून माघार, विनोद तावडेंची शिष्टाई

■ मुंबई : यश सावंत

बोरिवली विधानसभेतून उमेदवारी न दिल्याने उत्तर मुंबई लोकसभेचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. ज्यामुळे भाजपाची आणि महायुतीची डोकेदुखी वाढली होती. ज्यानंतर भाजपाचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची भेट घेत समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण तरी सुद्धा गोपाळ शेट्टी हे आपल्या निर्णयावर ठाम असल्याचेच पाहायला मिळाले. पण आता उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच गोपाळ शेट्टी यांनी उमेदवारी मागे घेत असल्याची घोषणा केली आहे. विनोद तावडे यांच्याशी चर्चा केल्यानंतर शेट्टी यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांची ही शिष्टाई यशस्वी ठरली आहे.

लोकसभा निवडणुकीत गोपाळ शेट्टी यांचे तिकीट कापल्याने ते नाराज झाले होते. त्यानंतर त्यांना बोरिवली विधानसभा मतदारसंघाचे तिकीट दिले जाईल, अशी चर्चा होती. मात्र भाजपाने जाहीर केलेल्या तिसऱ्या यादीत गोपाळ शेट्टी यांना उमेदवारी न देता संजय उपाध्याय यांना उमेदवारी जाहीर केली. यामुळे गोपाळ शेट्टी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पण यानंतर गेल्या कित्येक दिवसांपासून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून गोपाळ शेट्टींची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरु होते. काही दिवसांपूर्वी मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार आणि खासदार पियुष गोयल यांनी गोपाळ शेट्टींची भेट घेतली होती. तसेच



देवेंद्र फडणवीसांनीही त्यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न केले होते. पण गोपाळ शेट्टी हे निर्णयावर ठाम होते.

पण पुन्हा गोपाळ शेट्टी यांच्या घरी बैठक घेण्यात आली. या बैठकीला भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, किरीट सोमय्या, खासदार पियुष गोयल हे उपस्थित होते. या तिन्हीही वरिष्ठ नेत्यांकडून गोपाळ शेट्टी यांची समजूत काढण्यात आली. यानंतर गोपाळ शेट्टी यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत म्हटले की, होय मी माघार घेत आहे. मी आमदार बनण्यासाठी लढत नाही. मला दुसऱ्या पक्षांकडून देखील ऑफर होत्या. मात्र मला तसे करायचे नव्हते. माझी लढाई विशिष्ट कार्यपद्धतीसाठी होती. गोपाळ शेट्टी करतोय तर करू दे, काय फरक पडतो असे आमच्या पक्षात नाही. त्यामुळे सर्व पक्षश्रेष्ठी मला भेटायला आले. (शेष पृष्ठ २ वर)

## देहव्यापाराच्या तस्करीत ३० टक्के महिला महाराष्ट्रातील!

### नोकरीच्या आमिषाने गोव्यात आणून फसवणूक

■ तिसवाडी : प्रथमेश चव्हाण


गोव्यातून जानेवारी २०१९ ते ऑगस्ट २०२४ दरम्यान देहव्यापारातून सुटका केलेल्यांपैकी सुमारे ३० टक्के महिला या महाराष्ट्रातील असून त्यांना चांगल्या नोकरीचे आमिष दाखवून राज्यात आणले होते. सुमारे १७२ महिलांची देहव्यापारातून सुटका करण्यात आली. त्यातील पीडित महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे आणि इतर भागातील असल्याची माहिती गोव्यातील देहव्यापारासाठी तस्करी करणाऱ्यांशी लढा देणारी संस्था एआरझेडने आपल्या अहवालात जाहीर केली आहे. महाराष्ट्र गोव्याच्या शेजारी असल्याने या पीडितांना येथे आणणे सोपे होते, हे महत्त्वाचे कारण ठरले. त्यापैकी बहुतांश नोकरीच्या शोधात इतर राज्यांमधून महाराष्ट्रात स्थलांतरित झाल्या होत्या. मोजकीच ग्रामीण महाराष्ट्रातील असून मुंबई, पुणे किंवा ठाणे या मोठ्या शहरात स्थायिक होऊन,



डान्सबार, मसाज पार्लर किंवा केटरिंग व्यवसायात काम करत होत्या. काहींनी चित्रपट उद्योगात छोट्या नोकऱ्या केल्या. येथील देहव्यापारातून सुटका करण्यात आलेल्यांपैकी आणखी काही पीडित मुंबईतील कामाठीपुरा आणि पुण्यातील बुधवार पेठ या महाराष्ट्रातील दोन मोठ्या "रेड लाइट" क्षेत्रातून गोव्यात तस्करी करून आणल्या गेल्या. मुंबईतील कामाठीपुरा हा देशातील सर्वात मोठा रेड लाइट क्षेत्र आहे, तर पुण्यातील बुधवार पेठ तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे अहवालात नमूद केले आहे. अस्वच्छता आणि वाईट परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील हे रेड लाइट क्षेत्र संपण्याच्या मार्गावर असून काही देहव्यापार करणाऱ्या महिलांना गोव्यात स्थलांतरित होण्यास प्रवृत्त केले आहे. गेल्या पाच वर्षांत सुटका करण्यात आलेल्या १७२ पीडितांपैकी बहुसंख्य, केवळ इयत्ता आठवीपर्यंतच्या शैक्षणिक पात्रतेमुळे त्यांना रोजगाराचे पर्याय नसल्यामुळे त्या आर्थिकरीत्या असुरक्षित होत्या.

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स






## जुने रिंगण, नवे खेळ

सहा पक्षांच्या दोन युत्या-आघाड्यांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचा पट व्यापक होताच, पण नव्या भिडूंनी रिंगणात उडी ठोकल्याने तो अधिकच व्यामिश्र स्वरूपाचा झाला आहे. बंडखोरी, फोडाफोडी, पक्षवाऱ्या, उमेदवारीसाठीची साठमारी अशा कितीतरी कारणांनी निवडणुका गाजत असतात. जे प्रत्यक्ष दिसण्याजोगे असते, ते दिसतेच, पण न दाखवण्याजोग्याही असंख्य गोष्टी पडद्याआड घडत असतात. जातीपातीच्या भलाईसाठीचे राजकारण ही आजवर कुणी ढळढळीतपणे दाखवत नसले तरी 'जात' काही निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर जात नव्हती. यावेळी प्रथमच ताकाला जाऊन भांडे न लपवता जातीय राजकारणाची समीकरणे थेट माध्यमांसमोर घडवली किंवा बिघडवली जात आहेत.

आता हे चित्र महाराष्ट्रासाठी भल्याचे की घातक हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे. फार काळापूर्वी नव्हे, अगदी काही महिन्यापूर्वीपर्यंत एखाद्या जातीच्या भल्यासाठी अन्य समाजांना फटकारले जात होते, आता निवडणुकीची गणिते मांडून त्यांना जवळ घेतले जाताना दिसते. चार-पाच महिन्यांपूर्वी छोटयामोठया पक्षांना छत्रछायेखाली आणून बेरजा केल्या जात होत्या, आता अशा प्रत्यक्ष बेरजा कामी येत नाहीत हे पाहून वजाबाक्या करण्याचे दिवस आले आहेत. काटकोन त्रिकोणाच्या भाषेतून शह देणे,समांतर चालणे अशा गणिती भाषेचे दिवस आले आहेत महाराष्ट्रात! जातीअंताची लढाई संपली आहे अन नवा जातीयवाद पुरोगामी महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसला आहे, हे चित्र वास्तववादी म्हणून ठीक मानायचे की त्यातला प्रच्छन्नपणा पाहून खंत करायची? हा प्रश्न आहे.

अंतरवाली सराटीत मनोज जरांगे गेल्या काही दिवसांपासून मराठा समाजाच्या मागण्यांसाठी आंदोलने, उपोषणे करीत आहेत. जातवाले सत्तेत असून या समाजातल्या गरिबांची सत्तेच्या पाण्याने कधी मशागत झालीच नाही. शेते पिकली ती मूठभरांची, गरीब मराठा शेतकरी बिचारा आभाळाकडे




डोळे लावून नुसताच वाट पाहत बसला. हितसंबंधांचे बांध मोडून आमच्या विकासाकडे जरा लक्ष द्या, असे जेव्हा मराठा आंदोलनाने मूकपणाने सांगितले, तेव्हाही फारसे काही घडले नाही. पंचावन्न मोर्चे शांततेत काढूनही काही झाले नाही, हे बघितल्यानंतर मराठा आंदोलनाने जे वळण घेतले, त्यातून मनोज जरांगे-पाटील यांच्यासारखा नेता उगवला. त्यांची भाषा अनेकांना पचणारी नसेल, पण पिचलेल्या समाजाला तेच आता नेते वाटत आहेत, हे नाकारण्यात अर्थ नाही. फक्त समाजासाठी लढणाऱ्या जरांगे यांनी आजवर स्वत:ला कुठल्याही राजकीय पक्षाच्या दावणीला बांधले नाही. पण आपल्या मागे उभ्या असलेल्या समाजाची निवडणुकीच्या रिंगणातली ताकद ते ओळखून आहेत.

त्यांच्या मराठा आंदोलनामुळे किमान चार लोकसभा मतदारसंघातले निकाल बदलले, ही वस्तुस्थिती आहे. लोकसभेचा व्याप मोठा, विधानसभेचा तुलनेने छोटा, पण गुंतागुंतीचा. तेथे आता आरक्षणाच्या प्रतीक्षेतल्या मराठा एकसंध गठ्ठा मतांना मुस्लिम आणि दलित समाजाची जोड देण्याचा निर्णय झाल्याचे दिसून येते आहे. ही महाराष्ट्राच्या राजकारणातली वेगळी आणि संपूर्णत: नवीन समीकरणे आहेत. ज्या मराठवाडयात मराठा-दलित समाजातील संघर्ष कित्येक दशके चालला, जातीय अत्याचारांचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर नोंदले गेले, तिथे हे दोन्ही समाज प्रवाह एकत्र येताना वरकरणी तरी दिसत आहेत. प्रत्यक्षात ते एकत्र येतील का, हे निवडणुकीच्या निकालानंतरच कळू शकेल. पण तसे ते खरेच एकत्र येत असतील, तर सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने त्याचे स्वागतच केले पाहिजे.

मुस्लिम समाजाला समवेत घेण्याचा मार्ग जरांगेंनी यापूर्वी चोखाळला होताच, आता बौद्ध समाजातील काही कार्यकर्तेही त्यांच्या नजीक गेले आहेत. हे 'राजकीय संयुग' कसे यशस्वी ठरेल, किंबहुना ठरेल का, याचीही उत्तरे निवडणुकीनंतरच मिळतील. या नव्या समीकरणांचा कुणाला लाभ होईल आणि कुणाला तोटा, याची गणिते मांडण्यात राजकीय पंडित मश्गूल आहेत. पण खरे तर या समीकरणांकडे राजकारणाच्या चष्म्यातून पाहण्यापेक्षा सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया म्हणून अभ्यासायला हवे. कारण निवडणुकीच्या रिंगणात जे काही सध्या घडते आहे, ते अन्य ठिकाणीही घडताना दिसते. राजू शेट्टी, छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू प्रभृतींची आघाडीही बेरजेचा नवा खेळ रचते आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय अवकाशात प्रचंड उलथापालथ सुरू आहे. ती आपापत: घडते आहे की कुणी पद्धतशीर घडवते आहे? या प्रश्नाचे उत्तर कदाचित कधीच मिळणार नाही. धनगर, लिंगायत, वंजारी, माळी, कोळी असे अवघे समाज आहेत तरी किती याची गणितीय समीकरणे मांडली जात आहेत. अर्थात ती गणिते सगळ्याच निवडणुकांमध्ये मांडली जातात, पण यावेळी रिंगण अटीतटीचे आहे. निवडणुका फार कमी फरकाने जिंकल्या किंवा गमावल्या जाणार आहेत. उमेदवारांची संख्या प्रचंड आहे. राजकारणात नसलेले पण ते आडून हाकणारे नेते यापूर्वी महाराष्ट्राने बघितले आहेत. शरद जोशी, अण्णा हजारे आणि आता मनोज जरांगे ही काही ठसठशीत, सहज आठवणारी नावे. पण आता हा आडपडदा दूर होताना दिसतो. रिंगणात थेट शड्डू ठोकणाऱ्या या एकांड्या शिलेदारांमुळे नवी राजकीय गणिते घडताना दिसतील, अशी चिन्हे आहेत. एकंदरीत निवडणुकीच्या राजकारणाचा पोतच बदलणारे हे रिंगण मतदानयंत्राच्या पलीकडले काही परिणाम साधून जाईल, आणि ते सकारात्मक असतील, एवढीच आशा आहे.

## बंडखोरांची दिवाळी



देशाच्या राजकारणात महाराष्ट्र बंडखोर म्हणून ओळखला जातो. मात्र ही बंडखोरी विचारांची, तत्त्वांची आणि अस्मितेसाठीची होती. याच बंडखोरीनं आता सत्ता, पद आणि पैसा यांच्या लालसेचं रूप घेतले आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रानं अनेक राजकीय भूकंप जवळून अनुभवले आहेत. उद्धव ठाकरे यांनी युतीतून बाहेर पडून मांडलेली वेगळी चूल असो किंवा एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी केलेली बंडखोरी... यंदाच्या निवडणुकीत प्रायोजित बंडखोरीलाही ऊत आला आहे. लोकशाहीत हे गृहितच आहे. आपलं उद्दिष्ट गाठण्यासाठी काही जण लढाऊपणाचा मार्ग अवलंबतात. मात्र सध्या या उद्दिष्टामागे सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो स्वअस्तित्वाचा. पक्षानं उमेदवारी न दिल्यानं अस्तित्वाचा प्रश्न तयार होईल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसकट कार्यकर्त्यांवरची पकडही कमी होण्याची भीती असते. युती आणि आघाड्यांच्या राजकारणात मर्यादित होत जाणारी संधी ही अनेकांच्या आशा-अपेक्षांवर विरजण घालणारी ठरते आणि त्यातून बंडखोरीला बळ मिळतं. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट, भाजप आणि काँग्रेस हे दोन राष्ट्रीय पक्ष, वंचित बहुजन आघाडी आणि मनसे हे दोन प्रादेशिक पक्ष, राजू शेट्टी, संभाजीराजे छत्रपती आणि बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील परिवर्तन महाशक्ती अशा विविध पक्षांचे अधिकृत उमेदवार आणि त्यात अनेकांची बंडखोरी. असा एक सर्वपक्षीय गोंधळ सध्या होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळतो आहे. युती आणि आघाडी यांच्या समोरचा पुढील काही दिवसांचा मुख्य मुद्दा हा पक्षांतर्गत बंडखोरी शमवणं हाच असणार आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार महायुतीसमोर ३८ तर मविआसमोर १८ बंडखोराचं आव्हान आहे. त्यातलीच एक लक्षणीय लढत म्हणजे मुंबईतील माहीम मतदारसंघातील. शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर यांच्या संभाव्य बंडखोरीचा पवित्रा राज्यात चर्चेचा विषय ठरला आहे. सरवणकर यांना पक्षानेच तिकिट दिलं असलं तरी, हा मतदारसंघ राज ठाकरे यांच्यासाठी सोडावा अशी महायुतीतल्या नेत्यांची इच्छा आहे. कारण लोकसभेत राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त मदत केली होती. सरवणकर यांची अडचण वेगळीच आहे. जो मतदारसंघ गेली तीन दशक वाढवला, तो आता मित्रपक्षातल्या एका राजपुत्रासाठी सोडून देणं सरवणकरांना चांगलेच जिव्हारी लागले आहे.

विधानपरिषदेचा परतावा मिळेलही मात्र त्यातून हक्काचा मतदारसंघ मिळणार नाही आणि मुलाला विधानसभेत पाठवण्याचं स्वप्न कायमचं भंग होईल, ही भीती सरवणकरांना आहे. तिकडे नाशिकच्या नांदगावमध्ये भुजबळ कुटुंबातून समीर भुजबळ यांनी सुहास कांदे यांच्या विरोधात बंडाचं निशाण फडकवलं आहे. या मतदारसंघातील कांदे विरुद्ध भुजबळ लढाई दशकापासून चालत आलेली आहे. युतीचाच भाग असलेल्या सुहास कांदे यांनीही छगन भुजबळ यांच्या विरोधात शंखनाद केला आहे. तर युतीचाच भाग असूनही सावत्र वागणूक मिळणारे नवाब मलिक यांनीही बंडाचं निशाण अधिकृत एबी फॉर्म घेऊन फडकवलंय. या प्रत्येक नेत्याला आपल्या आणि कुटुंबाच्या राजकीय अस्तित्वाचा प्रश्न सतावतो आहे. या बंडखोरींमागे इतर कोणतीही तत्त्व किंवा विचाराचा आधार दिसत नाही.

हरियाना विधानसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणूक निकालांवर नजर टाकली, तर काँग्रेसला पराभव चाखायला लावणाऱ्या प्रमुख घटकामध्ये बंडखोरी हा कळीचा मुद्दा ठरला होता. दहा जागांवर काही शेकडा मतांनी काँग्रेसचा पराभव झाला तो फक्त पक्षानं उमेदवारी नाकारल्यानं बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांमुळे. तीच परिस्थिती महाराष्ट्रातही दिसत आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये कोण किती मत मिळवणार, यापेक्षा कोण कोणाची किती मत कापणार यावर सगळ्या प्रमुख पक्षांची भिस्त असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे साहजिकच पक्ष आणि उमेदवार पातळीवर शत्रूचा शत्रू तोच आपला मित्र हा नियम लावत बंडखोरांना रसद पुरवली जात आहे.

यात काही भांडवली उद्योजकांचेही अदृश्य हातही काम करत आहेत. राज्याच्या विधानसभेत १९९५ मध्ये ४५ अपक्ष निवडून आले होते. त्यातून अनेकांना मंत्रिपदाची संधी मिळाली. त्याला शंकरराव चव्हाण आणि सुधाकर नाईक विरुद्ध शरद पवार यांच्यातील तणावाची किनार होती. ज्या समर्थकांना पक्षाची उमेदवारी मिळाली नाही, अशा उमेदवारांना या दोघांकडून बळ देण्यात आलं होतं. यंदाच्या निवडणुकीत ४५ नसले तरी २५ ते ३० अपक्षांनी मजल मारली, तर युती किंवा आघाडीला या बंडखोरांच्या मदतीशिवाय सत्तेपर्यंत पोहोचता येणार नाही. स्वार्थी बंडखोरीची अशी अनेक उदाहरणं आपल्याला सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहेत. या बंडखोरीला ना विचाराचं, ना आचाराचं, ना सामाजिक दायित्वाचं सोयरसुतक. त्यामुळे येत्या २० तारखेला मतदान करताना जातीपातीत न अडकता व इतर आमिषांना बळी न पडता मतदार या बंडोबांना योग्य ती जागा दाखवतील, अशी आशा करू या आणि मतदीप उजळवू या.

## तमाच्या तळाशी दिवे लागू दे!

दिवाळी हा आता केवळ भारतातला सण व उत्सव राहिलेला नाही. तो जगभर साजरा होतो. वॉशिंग्टनमधील 'व्हाईट हाऊस'पासून अनेक राजप्रासाद, राष्ट्रप्रमुखांची निवासस्थाने आणि भारतीय राहात असलेले पृथ्वीच्या पाठीवरील दोनशेपेक्षा जास्त देश दिवाळी वाढत्या उत्साहाने साजरी करीत आहेत. इतका सार्वत्रिक विस्तार असणारे जगात ईद आणि नाताळ हे दोनच सण असावेत. भारताची नवीन आर्थिक वाटचाल सन १९९१मध्ये सुरू झाली आणि त्यानंतर क्रमाक्रमाने भारतातील दिवाळीचे तेज वाढत गेले आहे.

केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील अनेक उद्योग, विपणन म्हणजे मार्केटिंगचे तज्ज्ञ आणि विविध बाजारपेठा दिवाळी डोळ्यांसमोर ठेवून व्यवसाय वृद्धीची आखणी करीत असतात. गेल्या वर्षीची आकडेवारी पाहिली तर २०२३च्या दिवाळीत ३.७५ लाख कोटी रुपयांचे आर्थिक व्यवहार केवळ भारतात झाले. या व्यवहारांनी किती मोठी उलाढाल झाली असेल आणि तिचा कसा कोट्यवधी आयुष्यांना स्पर्श झाला असेल, याची आपण कल्पना करू शकतो. यंदा हा आकडा ४.२५ लाख कोटी रुपयांच्या घरात जाईल, असा अंदाज आहे. ही ५० हजार कोटी रुपयांची वाढ लक्षणीय आणि वाढत्या अर्थकारणाची ताकद सूचित करणारी आहे.



जगभर 'नाताळ म्हणजे ख्रिसमसचे अर्थकारण' असा वेगळा विचार केला जातो. ती उलाढाल अब्जावधी डॉलरची असते. भारतात दिवाळी आणि लग्नसराई या दोन्हींचे वाढते अर्थकारण ही भारतीय अर्थव्यवस्थेला संजीवक चालना देणारी दोन प्रमुख घटिते आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय दीपोत्सवाने वसुबारस तसेच धनत्रयोदशी या अलीकडल्या दोन तिथी आपल्यात सामावून घेतल्याने दीपावली चारऐवजी सहा दिवसांची झाली आहे. काही काळाने याही अलीकडली 'रमा एकादशी'ही दिवाळीत येऊ शकेल. तशीही, बाजारपेठा, कुटुंबे आणि व्यवसाय यांची लगबग दसरा म्हणजे विजयादशमीलाच सुरू होते. हा सरासरी वीस दिवसांचा काळ सर्वच अर्थांनी मोठा तेजीचा व त्यातून येणाऱ्या समाधानाचा असतो.

महाराष्ट्रापुरता विचार केला तर आता दर पाच वर्षांनी दिवाळी आणि विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी यांची भेट व्हायला लागली आहे. 'एक देश-एक निवडणूक' झाली तर ही संगत सुटेलही. पण राजकीय पक्ष व नेते चतुर असल्याने ते या दीपावलीचा सुयोग्य वापर करून योग्य ठिकाणी दिवे उजळवतात! 'बाजार' ही एक प्रचंड मोठी शक्ती आहे आणि ती लोकजीवन व आता धर्मजीवनालाही व्यापून-वेटाळून राहिली आहे. दिवाळीत याचे क्षणोक्षणी प्रत्यंतर येते. मात्र, दिवाळीचा जो मुख्य आदिम संदेश आहे तो प्रकाशाचा आहे. मात्र, 'तम निशेचा सरला...' मधला तम म्हणजे केवळ सूर्यास्ताने पसरणारा अंधार नाही आणि निशा म्हणजे केवळ पाठोपाठ उतरणारी रात्र नाही. आपल्या पूर्वजांनी या प्रकाशाच्या उत्सवाची पहिली थरथरती ज्योत पेटवली असेल तेव्हा त्यांच्या मनात या ज्योतीने निरंजन तेजाची आरती करणे तर असणारच; मात्र, त्या पलीकडे मानवी जीवनातील सगळेच अंधकार दूर करण्याची उंच आकांक्षा असणार. मानवी जीवनात निदान दोन प्रकारचा अंधार असतो. एक ज्ञानाच्या अभावाने पसरतो आणि दुसरा उन्नत सहानुभावाच्या अभावाने ग्रासतो.

'अज्ञान म्हणजे अंधार' हे सूत्र मानवी संस्कृतीने बाळपावले टाकली; तेव्हापासून विकसित होत आले आहे. भारतीय तत्त्वज्ञानात तर हे रूपक ठायी ठायी दिसून येईल. जगातही परमार्थाची परिभाषा पाहिली तर ज्ञान व उजेड यांचा अन्योन्य संबंध लक्षात येईल. कोणताही प्रकाश महत्त्वाचा, कारण तो आपल्या सन्मुख वास्तवाचे यथामूल, यथातथ्य दर्शन घडवितो. ही साधी भौतिक घटनाही जगणे सोपे करणारी असते. मग ज्ञानाच्या अशा प्रकाश-दर्शनाला तर काहीच सीमाच नाही.

## दंडाना असलेली चरबीमुळे जाड अगडबंब दिसता? थुलथुलीत चरब ७ दिवसात करा कमी

लठ्ठपणा कसा वाढतो हे तुम्हाला माहीत आहे का? जेव्हा तुम्ही जास्त अन्न खाता आणि त्यातून मिळणाऱ्या कॅलरी खर्च न करता, तेव्हा वजन वाढते. हे वजन आधी शरीरात पोटावर हल्ला करते आणि पोटाभोवती अतिरिक्त चरबीचा थर जमा होऊ लागतो. हळूहळू ते यकृत, मूत्रपिंड आणि फुफ्फुसांना घेरते, जे खूप धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पोटावरील चरबी काढून टाकणे खूप गरजेचे आहे. पोटावरील चरबीसाठी बसणे जबाबदार मानले जात असले तरी, माझ्यावर विश्वास ठेवा, तुम्ही बसून पोटाची ही हट्टी चरबी काढून टाकू शकता. यासाठी काही व्यायाम आणि काही सोपी कामे करावी लागतील जी तुम्ही करू शकता.

जाड हात तुमचे सौंदर्य कमी करतात. यामुळे, तुम्हाला स्लीव्हलेस कपडे घालणे चांगले वाटत नाही त्यामध्ये तुम्ही फिट दिसत नाही. अशा परिस्थितीत, जर तुम्ही तुमचे जड हात कमी करण्यासाठी महिनाभर काही विशेष योगासने केली तर त्याचा परिणाम ३ ते ४ आठवड्यांत दिसून येईल. हे करणे सोपे आहे आज आम्ही तुम्हाला ३ योगासनांबद्दल सांगत आहोत, जे दररोज १० मिनिटे केले तर तुम्हाला महिनाभरात चांगले परिणाम दिसू लागतील.

सिटिंग क्रंच म्हणजे तुम्ही खुर्चीवर बसून हा व्यायाम करू शकता. यामध्ये तुम्ही खुर्चीवर बसताच तुमचे दोन्ही हात पूर्णपणे वर करा आणि मुठी तयार करा आणि उघडा. हे अनेक वेळा करा. यानंतर,



खुर्चीला काही जागेवर आणा आणि पाय पूर्णपणे सरळ ठेवून पसरवा आणि बसताना दोन्ही हात पायाच्या बोटांपर्यंत घ्या. या व्यायामामुळे पोटाची चरबी कमी होईल आणि ती मजबूत होईल. हे ३-३ सेट दिवसातून १५ वेळा करा. एक महिना फरक करू शकतो.

बटरफ्लाय पोजला बुद्ध कोनासन व्यायाम म्हणतात. हे पोटाची चरबी वितळण्यासाठी ओळखले जाते. यामुळे तणावही दूर होईल. यामध्ये तुम्हाला जमिनीवर बसावे लागेल. सर्वप्रथम, आरामशीर मुद्रेत बसा आणि दोन्ही पाय आरामात उघडा.

पान १ वरून...

### मनोज जरांगेंकडून विधानसभा...

त्यामुळे आपण निवडणूक लढायची नाही, असा निर्णय घेण्यात आला. फक्त उमेदवार पाडायचे,' असे आमच्या बैठकीत ठरल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. एका जातीवरून कोणीही निवडून येऊ शकत नाही. माझं एवढं राजकीय आकलन आहे. एवढे ताकदवान पक्षांनाही एकत्र यावं लागलं. राजकीय प्रक्रिया हाताळणं ही साधी गोष्ट नाही. मी तर या राजकीय प्रकरणात लेकरू आहे. आंदोलनात हजार पाचशे लोक असले तरी चालून जातं. मात्र राजकारणात लोकांची गोळाबेरीज करावी लागते, असेही जरांगे यांनी सांगितले.

### 'मला निवडणूक लढवावीच...

निवडणुकीबाबत चर्चा करू इच्छितात. त्यावर राज ठाकरे यांनी मला काही बोलायचं नाही, तुम्हाला उमेदवारी मागे घ्यायची असेल तर घ्या, तुम्हाला निवडणूक लढवायची असेल तर लढा, असा संदेश पाठवला. त्यामुळे त्यांच्याशी पुढे कोणत्याही प्रकारचं बोलणं झालं नाही. त्यांनी भेट देखील नाकारल्यामुळे मला आता निवडणूक लढवावीच लागेल'.

शिवसेनेचे (शिंदे) आमदार म्हणाले, राज ठाकरेंशी माझं बोलणं झालं नाही. त्यांनी भेटही नाकारली. त्यामुळे आता मला निवडणूक लढवणंष्ठ मला त्यांना भेटून विनंती करायची होती, मात्र त्यांनी भेटच नाकारल्यामुळे माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी काय करावं असा प्रश्न पडला आहे. मी एक सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. मला माझी इच्छा त्यांच्यापुढे बोलून दाखवायची होती. काही समीकरणं समजावून सांगायची होती. मात्र त्यांनी सांगितलं की त्यांना भेटायचं नाही. तुम्हाला निवडणूक लढायची असेल तर लढवा, निवडणुकीला उभं राहायचं असेल तर उभे राहा. त्यामुळे मला त्यांची भेटच मिळणार नसेल तर मला उमेदवार म्हणून काम करावं लागणार आहे. राज ठाकरे यांनी भेट नाकारल्यामुळे मला निवडणूक लढवावी लागेल'.

### कांदिवली औद्योगिक वसाहतीचा ११६...

हा भूखंड औद्योगिक वापरासाठी वितरित करताना त्यापैकी १६ भूखंड सार्वजनिक वापरासाठी तर उर्वरित दीडशे भूखंड औद्योगिक वापरासाठी वितरित करण्यात आले होते. यापैकी काही भूखंड प्रति चौरस मीटर फक्त ६६ रुपये दराने कब्जेहक्काने तर काही अटी-शर्तींच्या अधीन राहून प्रदान करण्यात आले. या भूखंडांचा औद्योगिक वापर वगळता बार, रेस्तराँ, कापड दुकाने, जिम, पब, खासगी वितरक, लॉज, कार शोरूम आदींसाठी वापर होत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते रेजी अब्राहम यांनी निदर्शनास आणून दिले होते. त्यावेळी तत्कालीन उपनगर जिल्हाधिकारी मिलिंद बोरीकर यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र लिहून या अनधिकृत वापराबद्दल कारवाई करण्यास सांगितले होते. परंतु त्यानंतरही काहीही झाले नव्हते. मात्र अब्राहम यांचा जिल्हाधिकारी कार्यालयाशी सतत पाठपुरावा सुरू होता.

या भूखंडाचा औद्योगिक वापर करण्याचा आदेश महसूल विभागाने १९६१ मध्ये जारी केला होता. मात्र या संपूर्ण प्रक्रियेवर प्राधिकृत अधिकारी म्हणून उपनगर जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. वितरणाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यानंतर ही वसाहत उद्योग विभागाकडे हस्तांतरित करून व्यवस्थापन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले होते. महामंडळाने कांदिवली सहकारी औद्योगिक संस्थेला अधिकार बहाल केले. या संस्थेने औद्योगिक वापर वगळता अन्य व्यावसायिक वापरासाठी परस्पर परवानगी दिली. यापोटी आकारण्यात आलेली अनर्जित रक्कमही संस्थेने वसूल केली. याबाबत उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई करणे अपेक्षित असतानाही दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप अब्राहम यांनी केला. याबाबत असंख्य तक्रारी झाल्यांनतर आता महसूल विभागाने हा भूखंड उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी ताब्यात घेण्याचे आदेश ८ ऑक्टोबर रोजी जारी केला. या आदेशानुसार उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई सुरु केल्यानंतर संस्थेने उच्च न्यायालयात धाव घेतली. आपली बाजू ऐकून घेतली नाही, असा दावा संस्थेने न्यायालयात केला. न्यायालयाने या प्रकरणी शासन निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली आहे.

### गोपाळ शेट्टींची निवडणुकीच्या...

तसेच, माझं मत श्रेष्ठींपर्यंत पोहोचले. बाहेरचा उमेदवार आणू नये असे मी मुळीच म्हणत नाही. मात्र हे सातत्याने होत असल्याने मला हे करावे लागले. प्रत्येकवेळी निर्णय घेणारा माणूस एकच नसतो. मी अशा कार्यकर्त्यांचे नेतृत्व करतो जे पक्षश्रेष्ठींचे ऐकतात. मी पक्ष नेतृत्वाचे ऐकतो तसे ते देखील ऐकतात. पक्ष व्यक्तीपेक्षा मोठा असतो. पक्षाकडे आपल्या भावना मांडल्या आहेत. पक्षाला समजायला वेळ लागणार नाही असे नाही. लोकांना काय वाटेल मला माहिती नाही. पक्षाच्या नेत्यांवर नाराज नाही, पण काही नेते आहेत ते असे करत असतात. नकळत होत असेल पण त्यांना लक्षात आणून दिलेले आहे, असे यावेळी गोपाळ शेट्टी यांच्याकडून सांगण्यात आले.

### पोलिसांना नेमलेलेच...

सहा वर्षापूर्वी नवी मुंबईमध्ये पालिका, सिडको, एमआयडीसीमधील काही अवैध बांधकामे रोखण्यासाठी न्यायालयाने सविस्तर आदेश दिले होते. तसेच कारवाई करताना हद्दीचा वाद होणार नाही, यासाठी या तिन्ही प्रशासनाने विशेष सेलची स्थापना करावी, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. याच्यासह अनेक गोष्टी या आदेशामध्ये नमूद करण्यात आल्या होत्या मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तसेच प्रशासन आणि त्यांच्या अधिकाऱ्यांचा असा निष्काळजीपणा आम्ही खपवून घेणार नाही, असेही न्यायालयाकडून बजावण्यात आले आहे

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# झोपु योजनेत अनियमितता केल्याचा आरोप, आकृती डेव्हलपर्ससह मुरजी पटेल यांच्या चौकशीची याचिकेद्वारे मागणी

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

मरोळ, अंधेरी येथील चार झोपडपट्टी रहिवाशांनी आकृती डेव्हलपर्सचे संचालक आणि अंधेरी पूर्व येथील शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) उमेदवार मुरली कांजी पटेल यांच्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच, १९९५ मध्ये सुरू झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत आकृती डेव्हलपर्स आणि पटेल यांनी अनियमितता केल्याचा आरोप करून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे.

अंगद सूर्यवंशी आणि अन्य तीन रहिवाशांनी ही याचिका केली आहे. या याचिकेनुसार, आकृती डेव्हलपर्स आणि पटेल यांनी याचिकाकर्त्यांना त्यांच्या सदनिकांच्या बदल्यात कायमस्वरूपी घरे देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, याचिकाकर्त्यांना ही घरे अद्याप मिळालेली नाहीत. विकासक आणि त्याचे सहकारी पटेल यांनी छळ केल्याचा आरोपही याचिकाकर्त्यांनी केला आहे. तसेच, इतर पात्र रहिवाशांनाही कायमस्वरूपी घरे मिळाली नसल्याचे याचिकेत अधोरेखित केले आहे. आपण १९९५च्या आधीपासून मरोळ, अंधेरी परिसरात वास्तव्यास असून एमआयडीसी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत कायमस्वरूपी घर मिळण्यास पात्र आहोत. पात्र झोपडीधारकांसाठी आवश्यक असलेली सगळी कागदपत्रे आपल्याकडे आहेत. मात्र, विकासक आणि पटेल यांच्याकडून सर्व रहिवाशांची फसवणूक होत असल्याचा आरोपही याचिकाकर्त्यांनी केला आहे.

एमआयडीसीने मरोळमधील याचिकाकर्त्यांचा परिसर झोपडपट्टी म्हणून घोषित केली. त्यानंतर, फेब्रुवारी १९९५ मध्ये आकृती हबटाऊनसह झोपडपट्टीच्या पुनर्विकासाबाबत करार करण्यात आला. त्या करारानुसार, विकासकाने रहिवाशांना कायमस्वरूपी घर देण्याचे आश्वासन दिले. एमआयडीसीने १३



ऑक्टोबर १९९५ रोजी हा करार मान्य केला. तथापि, रहिवाशांना दिलेले मालकी हक्काच्या घराचे आश्वासन अद्याप पूर्ण झालेले नाही. विकासकाने इमारतीचा काही भाग पूर्ण करून काही सदनिका देण्यास सुरुवात केली आहे, परंतु, याचिकाकर्त्यांना योजनेचा लाभ मिळालेला नसल्याचा आरोपही याचिकाकर्त्यांनी केला आहे.


गेल्या चार ते पाच वर्षांचे प्रलंबित भाडे लवकरच अदा करण्याचेही आश्वासन विकासकाने दिले. परंतु, त्याचीही पूर्तता अद्याप झालेली नाही. याउलट, विकासकाने पात्र झोपडीधारकांना सातत्याने खोटी आश्वासने दिली. या सगळ्या पार्श्वभूमीवर, ३ जून २०२२ रोजी एमआयडीसीने विकासकाला नोटीस बजावली. शिवाय, एमआयडीसीच्या उप-अभियंत्याने विकासकाला विक्रीयोग्य सदनिकांची विक्री न करण्याचे आदेश दिले. त्यानंतर, ८ नोव्हेंबर २०२३ मध्ये एमआयडीसीने उद्योग आणि कामगार विभागाच्या सहाय्यक सचिवांना योजनेतील कथित अनियमितता, फेरफार आणि घोटाळ्यांची चौकशी करण्याची विनंती केली. प्रतिवादी विकासकासह सहकारी मुरजी पटेल यांनी झोपडीधारकांची जाणीवपूर्वक फसवणूक केल्याचाही आरोपही याचिकेत केला आहे. याचिकाकर्त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात या फसवणुकीत सहभागी असलेल्यांविरुद्ध तक्रार नोंदवून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. परंतु, पोलिसांनी कारवाई केली नाही. त्याविरोधात याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. भारतीय न्याय संहितेसह अन्य कायद्यांतर्गत विकासक आणि मुरजी पटेल यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्याचे आदेश द्यावेत. याशिवाय, आकृती हबटाउन, पटेल आणि संबंधित एमआयडीसी अधिकाऱ्यांनी केलेल्या संभाव्य गैरकृत्यांचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचेही आदेश द्यावेत, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

# खासगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयांना मुक्त फेरीतून वगळले, पुढील प्रवेश संस्थात्मक फेरीतून होणार

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या नियमित फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर उर्वरित जागांवरील प्रवेशासाठी २४ ऑक्टोबरपासून मुक्त फेरी राबविण्यात येत आहे. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुक्त फेरीच्या दुसऱ्या व तिसऱ्या फेरीमध्ये फक्त सरकारी वैद्यकीय व दंत महाविद्यालयांतील प्रवेश होणार आहेत. तर खासगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयांना या फेरीतून वगळण्यात आले आहे. खासगी महाविद्यालयातील प्रवेश हे संस्थात्मक फेरीतून करण्यात येणार असून, ही फेरी १ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे.

वैद्यकीय व दंत अभ्याक्रमाच्या तीन नियमित फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर सरकारी व खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त जागांसाठी २४ ऑक्टोबरपासून ऑनलाईन मुक्त फेरी राबविण्यात येत आहे. मात्र प्रवेश प्रक्रियेसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेवर निर्णय देताना न्यायालयाने सरकारी महाविद्यालयांमधील प्रवेश ऑ




नलाईन मुक्त फेरीद्वारे करण्यात यावे, तर पुढील दोन मुक्त फेऱ्यांमधून खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना वगळण्यात यावे. तसेच खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश हे संस्थात्मक फेरीद्वारे करण्यात यावेत असे निर्देश दिले. त्यामुळे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने खासगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयांमधील संस्थात्मक फेरीचे स्वतंत्र वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार पात्र विद्यार्थ्यांनी राज्य कोटा आणि संस्थात्मक कोट्यासाठी स्वतंत्रपणे विहित नमुन्यात संबंधित महाविद्यालयात ई-मेलद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे. ई-मेलद्वारे १ ते २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता अर्जदारांची यादी, गुणवत्ता यादी, निवड यादी आणि प्रतीक्षा यादी (कोटानिहाय) स्वतंत्रपणे महाविद्यालयातील फलकावर आणि संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यानंतर आवश्यक कागदपत्रे व शुल्कासह विद्यार्थ्यांना ३, ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यायचा आहे.

# नोकरदार महिलांसाठी २२ मजली वसतीगृह, आचारसंहितेनंतर म्हाडाचा प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव

■ **मुंबई : विशाल कारंडे**

राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून नोकरी-व्यवसायासाठी येणाऱ्या महिलांची मुंबईत निवासाची योग्य सोय व्हावी याकरीता म्हाडाने पुढाकर घेतला असून अशा महिलांसाठी ताडदेवमध्ये एक वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीची कार्यवाही २०२१ पासून सुरू होती, पण आता मात्र रखडलेला हा प्रकल्प मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती आणि पुनर्रचना मंडळाने ८० कोटी रुपये खर्चाच्या २२ मजली वसतिगृहासंबंधीचा प्रस्ताव तयार केला आहे. आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर हा प्रस्ताव राज्य सरकारकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे. प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवली जाईल.

मुंबईसह राज्यभरात परडणाऱ्या घरांचे प्रकल्प राबवून म्हाडाच्या माध्यमातून लाखो कुटुंबियांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून म्हाडाने विद्यार्थी आणि नोकरदार महिलांकरीता वसातिगृह बांधण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मुंबई मंडळाकडून काळाचौकी येथील जिजामाता नगरमध्ये विद्यार्थ्यांसाठी २२ मजली, तर दुरूस्ती मंडळाने ताडदेव येथील एम.पी. मिल कम्पाउंड परिसरातील २००० चौरस मीटर जागेवर नोकरदार महिलांसाठी २२ मजली वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई मंडळाने यासंबंधीचा प्रस्ताव मान्य करून घेत, निविदा प्रक्रिया अंतिम करून २०२२ मध्ये वसतिगृहाच्या कामाला सुरुवात केली. हे काम सध्या सुरू आहे. मात्र दुसरीकडे दुरुस्ती मंडळाने ताडदेवमधील




वसतिगृहाबाबत कोणतीही कार्यवाही केली नव्हती. त्यामुळे ताडदेवमधील वसतिगृह २०२१ पासून रखडलेले आहे. आता मात्र दुरूस्ती मंडळाला जाग आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नोकरदार महिलांसाठीच्या म्हाडाच्या पहिल्या वसतिगृहाचा आराखडा तयार करून अंतिम करण्यात आला आहे. तर वसतिगृहाचा प्रस्तावही तयार झाला आहे.

नोकरदार महिलांसाठी ताडदेवमध्ये बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहाचा प्रस्ताव लवकरच प्रशासकीय मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार असल्याचेही सूत्रांनी सांगितले. सरकारची मान्यता मिळाल्यानंतर वसतिगृहाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. निविदा प्रक्रिया अंतिम करून २०२५ मध्ये प्रत्यक्षात या वसतिगृहाच्या कामाला सुरुवात करण्याचे दुरूस्ती मंडळाचे नियोजन असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले. एकूणच रखडलेला हा प्रकल्प मार्गी लागणार असल्याने नोकरदार महिलांसाठी येत्या काही वर्षात निवाऱ्यासाठी एक चांगला पर्याय उपलब्ध होणार आहे.

मंत्रालय, चर्चगेट, मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी अशा परिसरात काम करणाऱ्या महिलांना त्याचा फायदा होईल, असा दावा करण्यात येत आहे. ताडदेव पोलीस स्थानकालगतच्या एम.पी. मिल कम्पाउंड परिसरातील संक्रमण शिबिराच्या जागेवर नोकरदार महिलांसाठी वसतिगृह बांधण्यात येणार आहे.

# दिवाळीत फटाके फोडताना जखमी झालेल्यांची संख्या ४९ वर

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

दिवाळीमध्ये ठिकठिकाणी मोठ्य प्रमाणात फटाके फोडण्यात आले. मात्र हे फटाके फोडताना मुंबईमध्ये गेल्या चार दिवसांत जवळपास ४९ जण जखमी झाले आहेत. यामध्ये लहान मुलांची संख्या अधिक



आहे. दिवाळीनिमित्त शहरात ठिकठिकाणी फुलबाजे, भुई चक्र, सुतळी बार, रॉकेट असे विविध प्रकारचे फटाके मोठ्या प्रमाणात फोडण्यात येत आहेत. हे फटाके फोडताना मुंबईमध्ये विविध ठिकाणी जवळपास ४९ जण जखमी झाले आहेत. केईएम रुग्णालयात १६ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. यामध्ये पाच लहान मुलांचा समावेश आहे. शीव रुग्णालयात १२ जणांवर उपचार करण्यात आले आहेत. जखमींपैकी पाच जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, बहुतांश रुग्ण हे भाजलेले आहेत. त्याचप्रमाणे नायर रुग्णालयात नऊ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. जखमींपैकी एकाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उर्वरित रुग्णांना बाह्यरुग्ण विभागात उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. कूपर रुग्णालयामध्ये दोन रुग्णांवर उपचार करण्यात आले असल्याची माहिती मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णलयांच्या प्रमुख व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. नीलम अंद्राडे यांनी दिली आहे. जे. जे. रुग्णालयामध्ये चारजण उपचारासाठी आले होते, यामध्ये एका लहान मुलाचा समावेश आहे. जखमींपैकी तीन जणांवर बाह्यरुग्ण विभागाताच उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले तर एका व्यक्तीच्या डोळ्याला दुखापत झाल्याने त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. जी. टी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तिघांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. तिघेही किरकोळ जखमी झाले होते. त्याचप्रमाणे फटाके फोडताना जखमी झाल्याने सेंट जॉर्जेस रुग्णालयामध्ये तीन जण उपचारासाठी दाखल झाले होते. या सर्वांना उपचार करून घरी सोडण्यात आल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली.

# काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता: अल्पसंख्यांक जागा शिवसेनेला गेल्यामुळे काँग्रेसचे इच्छुक नाराज

■ **मुंबई : यश सावंत**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता कुठे रंगात येऊ लागणार असताना महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आहे. काही ठिकाणी उमेदवारी नाकारल्यामुळे कार्यकर्ते नाराज आहेत. तर अल्पसंख्यांकांची संख्या जास्त मतदारसंघ शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) वाट्याला गेल्यामुळे अल्पसंख्यांक इच्छुक उमेदवारही नाराज झाले आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपुष्टात आल्यानंतर आता प्रत्येक मतदारसंघाचे साधारण चित्र स्पष्ट झाले आहे. त्यामुळे नाराजांची संख्याही वाढली आहे. शीव कोळीवाडा मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्यामुळे मुंबई महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी काँग्रेसची साथ सोडली. गेली ४४ वर्ष काँग्रेसमध्ये असलेल्या रवी राजा यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यामुळे आता काँग्रेसमधील नाराज कार्यकर्ते उघडपणे बोलू लागले आहेत. वडाळ्यामधील माजी नगरसेवक सुफीयान वणू यांनी समाज माध्यमांवर ध्वनिचित्रफित टाकून आपली नाराजी व्यक्त केली आहे. महाविकास आघाडीच्या नावाखाली मुंबईतून काँग्रेसला हद्दपार करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप




त्यांनी केला आहे. शीव कोळीवाडा मतदारसंघातही अशीच परिस्थिती आहे. रवी राजा यांच्या पक्ष सोडण्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे, याचा शीव कोळीवाड्यातील निवडणुकीवर परिणाम होऊ नये, म्हणून कार्यकर्त्यांसोबत बैठक घेऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचे काम करण्यात येत आहे. निवडणुकीच्या वेळी असे प्रकार घडत असतात. आम्ही कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करीत आहोत, निवडणुकीपूर्वी स्थानिक नेते आणि कार्यकर्ते एकत्र येऊन निवडणूक लढवतील, असा विश्वास मुंबई काँग्रेसचे पदाधिकारी संदीप शुक्ला यांनी व्यक्त केला. ज्या मतदारसंघात काँग्रेसला जास्त मते मिळत होती, जे मतदारसंघ काँग्रेसचे बालेकिल्ला म्हणून ओळखले जात होते, ज्या मतदारसंघात अल्पसंख्यांक मतदार जास्त आहेत असे मतदार संघ शिवसेनेला (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) यांना सोडले आहेत, एक लाखहून अधिक अल्पसंख्यांक असलेल्या जागा शिवसेनेला जातात, हा योगायोग समजावा का, असा सवाल सुफियान वणू यांनी केला आहे. गोवंडी, अणुशक्तीनगर, वांद्रे पूर्व, कुर्ला, कलिना, भायखळा, वर्सोवा हे मतदारसंघ काँग्रेसकडून हिरावले आहेत. या भागात काँग्रेसचे जाळे विस्तारू नये असा प्रयत्न यामागे दिसत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

# पालिका आयुक्तांची सफाई कामगारांसोबत दिवाळी, कामगारांच्या वसाहतीला सपत्नीक भेट

■ **मुंबई : गणेश बागडे**

महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिवाळीनिमित्त दादर येथील कासारवाडी परिसरातील महानगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या



वसाहतीला सपत्नीक सदिच्छा भेट दिली. मुंबईच्या दैनंदिन स्वच्छतेत मोलाचे योगदान देणाऱ्या सफाई कर्मचारांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे आयुक्तांनी आभार मानले व त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच महापालिका आयुक्तांनी सफाई कामगारांबरोबर दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी दिवाळीचा फराळही केला. दीपावलीनिमित्त कासारवाडी भागातील वसाहतीला भेट दिल्याबद्दल सफाई कर्मचार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी आयुक्तांचे आभार मानले. गगराणी यांनी यावेळी कासारवाडी परिसरातील स्वच्छता आणि इतर सोयी-सुविधांबाबत समाधान व्यक्त केले. गेल्याच आठवड्यात गगराणी यांनी सफाई कामगारांशी संवाद साधला होता. मुंबईतील रस्ते, गल्ल्यांच्या स्वच्छतेचे काम करणाऱ्या सफाई कामगारांशी पालिका आयुक्तांनी संपर्क साधण्याची ही पहिलीच वेळ होती. यावेळी आयुक्तांनी कामगारांच्या कामाचे कौतुक केले होते. तसेच स्वच्छता करताना मुखपट्टी (फेस मास्क), हातमोजे, रिफ्लेक्टिव्ह जॅकेट, गम बूट आदी सुरक्षा साधनांचा वापर करावा. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या विविध अडीअडचणी सोडविण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध आहे, असेही आश्वासन आयुक्तांनी यावेळी दिले होते.

# लैंगिक अत्याचारातून गर्भवती राहिलेल्या ११ वर्षांच्या मुलीला दिलासा; ३० व्या आठवड्यांत गर्भपात करण्याची उच्च न्यायालयाकडून परवानगी

■ **मुंबई : विशाल कारंडे**

लैंगिक अत्याचारातून गर्भवती राहिलेल्या ११ वर्षांच्या मुलीला ३० व्या आठवड्यांत गर्भपात करण्याची परवानगी उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन खंडपीठाने गुरूवारी दिली. जराही वेळ न दवडता गुरूवारीच या मुलीवर गर्भपाताची प्रक्रिया करण्यात यावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

लैंगिंक अत्याचारातून ही गर्भधारणा झाली असल्याने ती संपवू देण्याच्या मागणीसाठी या अल्पवयीन मुलीने वडिलांमार्फत उच्च न्यायालयात याचिका केली होती. कायद्याने २० व्या आठवड्यापर्यंत गर्भपाताची परवानगी आहे. त्यानंतर, गर्भपात करायचा असल्यास उच्च न्यायालयाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. न्यायालय तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर गर्भपात करण्याची परवानगी



देते किंवा नाकारते. न्यायमूर्ती शर्मिला देशमुख आणि जितेंद्र जैन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने या मुलीची मागणी मान्य करताना उपरोक्त आदेश दिले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि लैंगिक अपराधांपासून मुलांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यांतर्गत अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, वैद्यकीय समाप्ती कायद्यात नमूद केल्यानुसार आपत्कालिन परिस्थितीत २० आठवड्यांच्या गर्भधारणेच्या कालावधीपेक्षा जास्त असलेल्या गर्भधारणेची वैद्यकीय समाप्ती करण्याची परवानगी दिली जाऊ शकते. याचिकाकर्ती मुलगी अल्पवयीन असून लैंगिक अत्याचाराची पीडित आहे. तिची सगळी पार्श्वभूमी लक्षात घेता तिला ३० व्या आठवड्यांत वैद्यकीय प्रक्रियेद्वारे गर्भधारणेची समाप्ती करण्याची परवानगी दिला जात असल्याचे न्यायालयाने म्हटले.

# 'दम नव्हता तर उभं राहायचंच नव्हतं ना...', काँग्रेसच्या उमेदवार मधुरिमाराजे यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याने सतेज पाटील संतापले

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. आज (४ नोव्हेंबर) उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे अनेक मतदारसंघात बंडखोरी केलेल्या अनेक उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला, तर काहींनी मात्र आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. यातच कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसमध्ये मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला आहे.

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी निवडणुकीतून माघार घेतली. तसेच राजेश लाटकर यांना पक्षाने उमेदवारी नाकारली होती. मात्र, त्यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला. त्यामुळे उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या काही तासात कोल्हापूर जिल्ह्यातील काँग्रेसमध्ये मोठा गोंधळ पाहायला मिळाला. यातच मधुरिमाराजे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे काँग्रेसचे



नेते सतेज पाटील हे चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. 'मला कशाला तोंडघशी पाडलं? दम नव्हता तर उभं राहायचंच नव्हतं ना', असं म्हणत सतेज पाटील यांनी आपला संताप व्यक्त केला. 'निवडणूक लढायची नव्हती तर मग आधीच निर्णय घ्यायला पाहिजे होता. कारण ही माझी पूर्णपणे फसवणूक करण्यासारखं आहे. आम्हाला काही अडचण नव्हती. पण आधीच नाही म्हणून सांगायला हवं होतं. हे चुकीचं आहे, मला तोंडघशी पाडायची काय गरज होती? हे बरोबर नाही. अजिबात बरोबर नाही. मला कशाला तोंडघशी पाडलं? दम नव्हता तर उभं राहायचंच नव्हतं ना', असं म्हणत सतेज पाटील यांनी नाराजी व्यक्त केली.

नेमकं काय घडलं?

विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर कोल्हापूर उत्तर मतदारसंघांत कोणाला तिकीट द्यायचं? यावरून चांगलंच राजकारण तापलं होतं. कारण या मतदरसंघात काँग्रेसमध्ये अंतर्गत चुरस निर्माण झाली होती. आधी राजेश लाटकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. मात्र, त्यांच्या नावाला विरोध झाल्यानंतर मधुरिमाराजे छत्रपती यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. पण त्यानंतर आज अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दहा मिनिटांत खासदार शाहू महाराज, युवराज मालोजीराजे छत्रपती व मधुरिमाराजे छत्रपती यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचत उमेदवारी मागे घेतली. यानंतर राजेश लाटकर हे चांगले कार्यकर्ते असून त्यांच्यासाठी मधुरिमाराजे यांचा अर्ज मागे घेत असल्याचे शाहू छत्रपती यांनी सांगितलं. मात्र, यामुळे काँग्रेस नेते सतेज पाटील नाराजी व्यक्त केली. दरम्यान, यावरून कोल्हापूर काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी शिट्टी झाले खुले चिन्ह: बहुजन विकास आघाडी सह इतर अपेक्षांना शिट्टी चिन्ह मिळू शकणार

**■ पालघर : सचिन कदम**

**भारत निवडणूक आयोगाने जनता दल (युनायटेड) या पक्षाला शिट्टी चिन्ह राखीव ठेवण्याबाबत ३० जानेवारी २०२४ रोजी जारी केलेले पत्र मागे घेतल्याने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी हे चिन्ह खुले चिन्ह म्हणून मानले जाणार आहे.**

त्यामुळे बहुजन विकास आघाडी पक्षासह इतर अपक्ष उमेदवारांना निवडणूक लढवण्यासाठी हे चिन्ह उपलब्ध होणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने ३० जानेवारी २०२४ रोजी जारी केलेल्या पत्रामधून आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी शिट्टी हे चिन्ह जनता दल (युनायटेड) या पक्षासाठी राखीव ठेवल्याची माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांना दिली होती. मात्र त्यानंतर २३ मार्च २०२४ रोजी भारत निवडणूक आयोगाने जारी केलेल्या अधिसूचनेत शिट्टी हे चिन्ह मुक्त चिन्हांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले होते.

या अनुषंगाने विधानसभा निवडणुकीच्या नामनिर्देशन दाखल करण्याच्या प्रक्रिये बहुजन विकास आघाडी पक्षाच्या उमेदवारांसह अनेक अपक्ष उमेदवारांनी शिटी या चिन्हाची मागणी केली होती. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे भारत निवडणूक आयोग आला ३१ ऑक्टोबर रोजी पत्र लिहून शिट्टी या चिन्हाचा आगामी निवडणुकी वापर करण्याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. मात्र भारत निवडणूक आयोगाने शिटी हे चिन्ह जनता दल (युनायटेड) या पक्षासाठी राखीव ठेवण्यात आल्याने इतर कोणत्याही स्थानिक पक्ष अथवा अपक्षांना देण्यात येऊ नये असे सूचित केले होते.

या संदर्भात लोकसत्ता मध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर



बहुजन विकास आघाडीने मुंबई उच्च न्यायालयातील सुट्टीच्या न्यायाधीशांसमोर जनहित (रिट) याचिका दाखल केली होती. विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेत उद्या (४ नोव्हेंबर रोजी) उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असून त्यानंतर उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात येणार आहे. या विषयाचे गांभीर्य पाहून या याचिकेची सुनावणी उद्या सोमवारी सकाळी होणार आहे. या याचिकेत बहुजन विकास आघाडीने भारत निवडणूक आयोगाने ३० जानेवारी २०१४ रोजी जारी केलेल्या पत्र व त्यामुळे झालेल्या परिणामांबाबत हरकत घेतली होती आहे. दरम्यान भारत निवडणूक आयोगाने ३० जानेवारी २०२४ रोजी जनता दल (युनायटेड) ला शिटी हे चिन्ह राखीव ठेवण्याबाबतचे पत्र मागे घेतल्याचा संदेश राज्य निवडणूक विभागाकडे प्राप्त झाला असून त्यामध्ये शिटी हे चिन्ह खुले झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामुळे निवडणूक चिन्ह वाटपाच्या नियमांनुसार विधानसभा निवडणुकीत बहुजन विकास आघाडी तसेच अपक्ष उमेदवारांना यांना प्राधान्यक्रमाने या चिन्हाचा वापर करणे शक्य होणार आहे.

# डोंबिवलीतील फडके रस्त्यावरील डीजे, ढोलताशांच्या दणदणाटाने रहिवासी हैराण

**■ डोंबिवली : सुचिता देशमुख**

उत्सवी रस्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवली पूर्वेतील फडके रस्त्यावर सण, उत्सवांच्या काळात मोठ्या आवाजात डीजेवर गाणी, ढोलताशांचे वादन केले जाते. सण, उत्सव काळात होणाऱ्या या दणदणाटाने फडके रस्ता भागात राहणारे रहिवासी, रुग्णालय चालक, व्यापारी त्रस्त झाले आहेत.

गुरुवारी फडके रस्त्यावर ढोलताशा वादनास चेंगराचेंगरीचे कारण देत पोलिसांनी बंदी घातली होती. दिवाळी सणाच्या दिवशी फडके रस्त्यावर ढोलताशांचे वादन ही पूर्वपरंपार प्रथा आहे. त्यामुळे राजकीय मंडळींनी हस्तक्षेप केल्यानंतर पोलिसांनी ढोलताशा वादनास पथकांना आवाजाची मर्यादा पाळून वादन करण्यास टिळक रस्त्यावर परवानगी दिली होती. यापूर्वी ढोलताशा वादनास परवानगी नाकारल्याने मोजकीच पथके गुरुवारी वादनास हजर होती.

फडके छेद रस्त्यावरील टिळक रस्त्यावरील ब्राह्मण सभा भागात या पथकांनी गुरुवारी दिवाळीच्या पहिल्या दिवशी वादन केले. हे वादन पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी उसळते. ढोलताशांचे वादन गुरुवारी दोन ते तीन तास चालू होते, असे टिळक रस्त्यावरील सोसायट्यांमधील अनेक रहिवाशांनी सांगितले. या दोन ते तीन तासाच्या कालावधीत या भागाती शांतता भंग पावली होती. घरात रुग्ण, लहान बाळे असतात. त्यांना मर्यादे पलीकडचा आवाज सहन होत नसतो. असे असताना या दणदणाटामुळे आम्ही रहिवासी खूप अस्वस्थ होतो, असे रहिवाशांनी सांगितले.

सण, उत्सव असला की उत्सवी कार्यक्रम फडके रस्त्यावर होतात. याठिकाणी यापूर्वी शांततेत कार्यक्रम पार पडत होते. शेकडो नागरिक या उत्सवी कार्यक्रमात सहभागी होत होते. त्यावेळी कोणालाही कसलाही त्रास होत नव्हता. गेल्या काही वर्षापासून उत्सवी कार्यक्रमांच्यावेळी डीजेवरची गाणी, ढोलताशा पथकांचा गजर फडके रस्त्यावर सुरू झाल्यापासून या भागातील शांततेचा भंग होण्यास सुरुवात झाली आहे, असे रहिवाशांनी



सांगितले. ढोलताशा वादन ही एक कला आहे. या पथकांनी फडके रस्त्याच्या विविध भागात आवाजाची मर्यादा पाळून ढोलताशा वादन केले तर आमची हरकत नाही. एकाच ठिकाणी, एकाच रस्त्यावर ही पथके एकत्र येतात. एकाचवेळी वादन सुरू होत असल्याने परिसरातील शांततेचा भंग होतो. आवाजाची मर्यादा पाळून हे कार्यक्रम झाले पाहिजेत, अशी भावना रहिवाशांनी व्यक्त केली. ढोलताशा पथकांचा गजर सुरू असतानाच त्याच्या दुसऱ्या बाजुला डीजेवर मोठ्या आवाजात गाणी लावली जातात. त्यामुळे फडके रस्ता भागात नक्की चालले काय याचा थांग लागत नसल्याची मते रहिवाशांनी व्यक्त केली. उत्सव काळात गर्दीमुळे दुकाने बंद ठेवावी लागतात. दुकाने बंद ठेवली नाहीतर पोलीस कारवाई करतात. सण, उत्सव काळात जोमाने खरेदी विक्री होते. याच काळात दुकाने बंद ठेवावी लागत असल्याने आर्थिक नुकसान सोसावे लागते, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. या सगळ्या शांतता भंगाविषयी काही व्यापारी, स्थानिक जागरूक रहिवासी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्याच्या दृष्टीने विचार करत आहेत.

# रस्त्यावरील पदपथावर भजी विक्रेत्याकडून सिलिंडरचा वापर

**■ डोंबिवली : भावना जैन**

नेहमीच गर्दीने फुलून गेलेल्या डोंबिवली पूर्वेतील फडके रस्त्यावरील अंबिका हॉटेलजवळील पदपथावर एक भजी विक्रेता दररोज संध्याकाळी पदपथाच्या बाजुला हातगाडी लावून त्याखाली सिलिंडर ठेऊन भजी विक्रीचा व्यवसाय करत आहे. उघड्यावर सिलिंडरचा वापर करणे प्रतिबंधित असताना पालिका, पोलीस अधिकाऱ्यांना न घाबरता हा विक्रेता बेधडक हा व्यवसाय करत आहे. कल्याण डोंबिवली पालिकेचे कर्मचारी विधानसभा निवडणूक कामात व्यस्त आहेत. पोलिसांच्या फडके रस्त्यावर फेऱ्या असल्या तरी त्यांच्या नजरेत सिलिंडर लावून भजी विक्री करणारा हातगाडी चालक नजरेत येत नसल्याबद्दल या रस्त्यावरील व्यापारी, विक्रेते, नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत. यापूर्वी पोलिसांनी



अशाप्रकारे रस्त्यावर सिलिंडरचा वापर करून विक्री व्यवसाय केल्या बद्दल संबंधित हातगाडी चालकांवर कायदेशीर कारवाई केली आहे. अलीकडेच टिळकनगर पोलिसांनी ९० फुटी रस्त्यावरील एका विक्रेत्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्याचे हातगाडीसह सिलिंडर जप्त केले आहे. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत डोंबिवली पूर्वेतील फडके रस्ता व्यापारी, विक्रेते, खरेदीदार यांनी गजबजून गेलेला असतो. डोंबिवली रेल्वे स्थानकालगत हा रस्ता येतो. या रस्त्यावरून रिक्षा, खासगी वाहनांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत हातगाडी जवळील सिलिंडरचा चुकून स्फोट झाला तर मोठा अनर्थ घडण्याची शक्यता व्यापारी व्यक्त करत आहेत. गेल्या आठवड्यापासून या हातगाडीच्या बाजुला फटाके विक्रीची दुकाने सुरू करण्यात आली आहेत.

# फुटीर आमदारांच्या विरोधात उद्धव ठाकरे यांची आक्रमक रणनीती, भिवंडी ग्रामीणमध्ये जिल्ह्यातील पहिली सभा

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

पक्षातून फूटून गेलेल्या ४० आमदारांविरोधात उद्धव ठाकरे यांनी आक्रमक प्रचार करायचे ठरविले असून भिवंडी ग्रामीण मधील शिवसेना शिंदे गटाचे आमदार शांताराम मोरे यांच्याविरोधात



उद्धव ठाकरे ठाणे जिल्ह्यात आपली पहिली जाहीर सभा घेणार आहेत. ठाकरे यांच्या पुढील नियोजनात कोपरी-पाचपाखाडी या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मतदारसंघातही सभा असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर ठाणे जिल्ह्यातील बहुतांश पदाधिकारी, नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. भिवंडी ग्रामीण पट्ट्यात शिवसेनेची मोठी ताकद आहे. येथील शिवसेनेचे आमदार शांताराम मोरे हे देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत आहेत. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातून पुन्हा एकदा पक्षाला उभारी देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी जिल्ह्यात शिंदे यांच्या उमेदवारांविरोधात उमेदवार दिले आहेत. भिवंडी ग्रामीण मतदार संघातून ठाकरे गटाचे शिवसेना आदिवासी कक्षाचे कार्याध्यक्ष महादेव आंबो घाटाळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. घाटाळ यांची शांताराम मोरे यांच्याविरोधात थेट लढत असणार आहे. या मतदारसंघात भाजपच्या स्नेहा देवेंद्र पाटील यांनी बंडखोरी केली असून त्यांनी या मतदारसंघात अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. स्नेहा पाटील या काल्हेर भागात माजी सरपंच होत्या. स्नेहा पाटील यांच्या बंडखोरीने शांताराम मोरे यांची डोकेदुखी वाढली असताना आता उद्धव ठाकरे हे स्वत: ठाणे जिल्ह्यातील पहिली सभा भिवंडी ग्रामीण मतदारसंघात घेणार आहेत. ठाणे शहरात कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे निवडणूक लढवित आहेत.

# ठाण्यात दिवाळी काळात हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ, गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत प्रदुषणात घट झाल्याचा पालिकेचा दावा

**■ ठाणे : विशेष प्रतिनिधी**

ठाणे महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी दिवाळीनिमित्ताने फटाक्यांची आतषबाजी करण्यात येत असल्यामुळे हवा गुणवत्ता निर्देशांक १९० वर पोहचला आहे तर, आवाजाची पातळी ८४ डेसिबल एवढी सर्वाधिक मोजण्यात आली आहे. यामुळे ठाण्यातील हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ झाल्याची बाब पुढे आली आहे. दरम्यान, गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत हवा आणि ध्वनी प्रदुषण कमी झाल्याचा तसेच हरित फटाके फोडण्याचे प्रमाण वाढल्याने धुलीकणांचे प्रमाण घटल्याचा दावा पालिकेच्या प्रदुषण नियंत्रण विभागाने केला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात दरवर्षी दिवाळी काळात हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ होते. यंदाच्या दिवाळीतही हे चित्र कायम आहे. या काळात फटाके वाजण्याच्या प्रमाणात देखील वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. शहरात दिवाळीपुर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक १२७ इतका होता.



दिवाळी काळात मात्र त्यामध्ये वाढ झाली असून शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक १९० एवढा नोंदवण्यात आला आहे. या काळात, आवाजाची पातळी ८४ डेसिबल एवढी सर्वाधिक मोजण्यात आली. दिवाळी पूर्व काळात ती ७१ डेसिबल एवढी होती. मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत आणि ज्युनियर केमिस्ट निर्मिती साळगावकर यांच्या पथकाने दिवाळी पुर्व आणि दिवाळी कालावधीत हवेची गुणवत्ता तपासण्याबरोबरच ध्वनीचे मापन केले. त्यामध्ये शहरात दिवाळी काळात हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ झाल्याचे समोर आले. गेल्या वर्षी प्रमाणेच यंदाही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर फटाके फोडले. हरित फटाक्यांचा वापर वाढला आहे. या वर्षीच्या तपासणीत दिवाळीच्या काळात ध्वनी आणि वायू या दोन्हीत वाढ नोंदवली गेली आहे. मात्र हे प्रमाण गेल्या दोन वर्षापेक्षा कमी आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक १९० पर्यंत वाढला असला तरी ठाण्याची हवा मध्यम प्रदूषित स्तरावर आहे, असा दावा पालिकेने केला आहे. शहरात हवेतील धूलीकणांचे प्रमाण १६५ मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतके आढळले आहे. २०२२ मध्ये धुलीकणांचे प्रमाण २४५ मायक्रोग्राम प्रति घनमीटर तर, २०२३ मध्ये २३० मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतके होते.

# जो गद्दारी करतो तो मुख्यमंत्री बनतो, उल्हासनगर भाजप जिल्हाध्यक्षाच्या वादग्रस्त वक्तव्याने तणाव

**■ उल्हासनगर : सतिश सोनावणे**

'आज जो गद्दारी करतो तू मुख्यमंत्री बनतो, राजकारणाची आजची व्याख्या बदलली आहे' असे गंभीर वक्तव्य उल्हासनगरच्या भाजप जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात केले. या वक्तव्यावरून उल्हासनगरात शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला असून भाजप उमेदवाराचे काम न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार आमदार कुमार आयलानी यांच्या अडचणी वाढण्याची



शक्यता आहे. रविवारी महायुतीच्या मेळाव्यापूर्वीच शिवसैनिकांनी प्रदीप रामचंदानी यांना जाब विचारल्याने काही काळ तणावाचे वातावरण होते. शिवसैनिकांनी मेळाव्यावर बहिष्कार टाकला. जोपर्यंत भाजपचे वरिष्ठ याबाबत आपली भूमिका स्पष्ट करत नाही तोपर्यंत आम्ही प्रचार करणार नाही, अशी भूमिका शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

एकीकडे महायुती इच्छुकांनी बंडोबांना थंड करण्यामध्ये शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या नाकी नऊ आले असताना उल्हासनगरात मात्र भाजपच्या एका बोलघेवड्या पदाधिकाऱ्याने वादग्रस्त वक्तव्य करत महायुतीत तणाव वाढवला आहे. शनिवारी उल्हासनगर विधानसभा मतदारसंघ साई पक्षाने भाजपसोबत आपली आघाडी जाहीर केली. यावेळी बोलताना भाजपचे उल्हासनगर जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत वादग्रस्त व्यक्त केले. 'राजकारणात जो गद्दारी करतो तो मुख्यमंत्री होतो, अशी राजकारणाची व्याख्या सध्या बदलली आहे, असे वक्तव्य रामचंदानी यांनी केले.

# अंबरनाथमध्ये आमदार किणीकरांच्या अडचणीत वाढ

**■ अंबरनाथ: आकाश कांबळे**

अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात मनसेने उमेदवार उभा केला नसला तरी मनसेचे आमदार राजू पाटील यांनी ठाकरे गटाचे उमेदवार राजेश वानखेडे यांना मदत करण्याचे सूतोवाच केले आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी ठाकरे गटाच्या उमेदवाराला मदत करण्याचे संकेत दिले आहेत. या घडामोडींमुळे शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार आणि आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार डॉ बालाजी किणीकर यांना कडवी लढत द्यावी लागणार असल्याची चिन्हे आहेत. सुरुवातीला शिवसेनेतून किणीकर यांना अंतर्गत विरोध होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः त्यात मध्यस्थी केल्याने दोन्ही गट एकत्र आले. किणीकर यांचा अर्ज दाखल करताना दोन्ही गटांनी आपली ताकद आणि एकता दाखवली. मात्र दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये कमालीचे मतभेद आहेत. त्यामुळे हे मतभेद मिटून त्याचे रूपांतर मतांमध्ये होतील का असा प्रश्न आहे. लोकसभा



निवडणुकीत ठाकरे गटाला अंबरनाथ विधानसभेत चांगली मते मिळाली. कोणतीही संघटनात्मक बांधणी किंवा ताकद नसताना मिळालेली ही मते शिवसेना शिंदे गटासाठी धोक्याची घंटा होती. या मतदारसंघात मनसेची ताकद लक्षणीय आहे. येथे मनसेने उमेदवार दिला नाही. मात्र लोकसभेत शिवसेना शिंदे गटासोबत काम करणाऱ्या मनसेला स्थानिक शिंदे गटाच्या नेत्यांनी विश्वासात घेतले नाही. त्यामुळे नुकत्याच मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमात मनसेचे आमदार राजू पाटील यांनी ठाकरे गटाच्या उमेदवाराला मदत करू असे सूतोवाच केले. ठाकरे गटाने येथे राजेश वानखेडे यांना उमेदवारी दिली आहे. वानखेडे आणि पाटील मनसेचे कुणाल भोईर यांच्या कार्यक्रमात एकत्र आले होते. त्यावेळी पाटील यांनी बोलताना वानखेडे हे आपले मित्र असून त्यांना मदत करूच. पक्ष काय निर्णय घेतो तेही पाहू असे वक्तव्य केले. त्यामुळे मनसे अंबरनाथ विधानसभेत ठाकरे गटाला मदत करणार असल्यास त्याचा फटका बालाजी किणीकर यांना बसण्याची शक्यता आहे. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीने येथे उमेदवार दिला आहे. मात्र स्थानिक पदाधिकाऱ्यांनी यापूर्वीच येथे उमेदवार देऊ नका, असे आवाहन पक्ष श्रेष्ठींना केले होते. तरीही उमेदवार दिल्याने स्थानिक पदाधिकाऱ्यांत नाराजी आहे. ज्यांना उमेदवारी दिली ते तीन वर्षापासून सक्रिय नाहीत. त्यामुळे वंचित बी टीम असल्याचा दावा करत दुसऱ्याच उमेदवाराला मदत होणार असल्याचे आरोप स्थानिक पदाधिकारी करत आहेत.

# सणासुदीला नालासोपाऱ्यात प्रचंड वाहतूक कोंडी

**■ वसई : सुचिता देशमुख**

दिवाळी सणाच्या निमित्ताने मोठा संख्येने नागरिक घराबाहेर पडत आहेत. शनिवारी सायंकाळी नालासोपाऱ्यात प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचे हाल झाले. तर दुसरीकडे याचा फटका रुग्णवाहिकेला बसला.मागील काही वर्षापासून नालासोपारा शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढले आहे. मोठ्या संख्येने वाहनांची वर्दळ ही पूर्व पश्चिम अशा दोन्ही ठिकाणच्या रस्त्यावर वाढली आहे. त्यामुळे सातत्याने या रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. विशेषतः सणासुदीच्या काळात नालासोपाऱ्यात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. शनिवारी दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने खरेदीसाठी मोठ्या संख्येने नागरिक घरा बाहेर पडले होते. मात्र वाहनांची वाढती गर्दी व वाहतूक नियमांचे उल्लंघन करून चालविल्या जाणाऱ्या वाहनचालक यामुळे सायंकाळी नालासोपारा उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी झाली होती. पूर्व पश्चिम अशा दोन्ही बाजूने वाहनांच्या



लांबच लांब रांगा लागल्या होत्या. ये जा करण्यास ही जागा नसल्याने प्रवाशांचे चांगलेच हाल झाले. तासंतास यात प्रवासी अडकून पडले होते.याशिवाय या वाहतूक कोंडीचा फटका रुग्णवाहिकेला बसला. बराच वेळ रुग्णवाहिका या कोंडीत अडकून पडली होती. वाहतूक पोलिसांकडून वाहतूक नियंत्रण केले जात असले तर रस्त्याच्या मध्येच उभी केलेली वाहने, विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीत अधिकच भर पडली होती.

दोन ते तीन तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले असे प्रवाशांनी सांगितले. या वाहतुक कोंडीमुळे खरेदीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांचा हिरमोड झाला. वाहतूक नियोजनाच्या अभावामुळे ही समस्या निर्माण झाली असल्याचा आरोपही प्रवाशांनी केला आहे. दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने मुख्य रस्ते यासह पदपथावर फेरीवाल्यांनी आपली दुकाने थाटली आहेत.

# आठ वर्षाच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू; उद्यानातील पाण्याच्या टाकीत पडला

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

वाशी सेक्टर १५ येथील मनपाच्या उद्यानातील पाण्याच्या टाकीत पडून एका आठ वर्षीय मुलाचा दुर्दैवी अंत झाला आहे. या प्रकरणी अद्याप कोणावर गुन्हा दाखल झाला नसून पोलीस दफ्तरी घटनेची नोंद करण्याचे काम सुरू आहे. शनिवारी दिवाळीचा पाडवा असल्याने लहान मुलांनी उद्याने फुलून गेली होती. वाशी सेक्टर१४ येथील पालवे उद्यानातही चिमुकल्यांची गर्दी होती. मात्र रात्री नऊ साडे नऊच्या सुमारास या गर्दीतील एक आठ वर्षीय मुलगा अचानक दिसेनासा झाला. त्याचा खूप शोध घेतला मात्र तो आढळून आला नाही.



काही वेळाने शंका आल्याने उद्यानातील भूमिगत पाण्याच्या टाकीचे झाकण उघडे असल्याचे लक्षात आल्याने टाकीत पाहणी केली असता मुलगा आढळून आला. त्याला बाहेर काढून नजीकच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. तिथे त्याच्या पोटात गेलेले पाणी काढण्यात आले, मात्र तेथे अतिदक्षता विभाग नसल्याने त्याला मनपा रुग्णालयात हलविण्यात आले. तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अशी माहिती स्थानिक माजी नगरसेवक प्रकाश मोरे यांनी दिली. सदर माहितीला दुजोरा वाशी पोलिसांनी दिला आहे. या घटनेची नोंद अद्याप न झाल्याने नाव माहिती नाही असेही वाशी पोलिसांनी सांगितले.

# अति पावसामुळे कापूस उत्पादनात घट: सात टक्क्यांनी घट होण्याचा सीएआयचा अंदाज

**■ मुंबई : गणेश बागडे**

अतिवृष्टी, चक्रीवादळामुळे गुजरातमध्ये झालेले नुकसान, परतीच्या आणि बिगर मोसमी पावसामुळे उत्तर महाराष्ट्रात झालेले नुकसान आणि आता ईशान्य मोसमी पावसामुळे दक्षिण कर्नाटकात होत असलेल्या नुकसानीमुळे देशाच्या कापूस उत्पादनात यंदा सुमारे ७.२७ टक्क्यांनी घट होऊन, ३१७.९५ लाख गाठी (एक गाठ – १७० किलो) कापूस उत्पादन होईल, असा अंदाज सीएआयने व्यक्त केला आहे. कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने (सीएआय) दिलेल्या माहितीनुसार, यंदा देशात कापूस लागवडी खालील क्षेत्रात दहा टक्क्यांनी घट झाली आहे. देशात कापसाचे सरासरी क्षेत्र १२९.३४ लाख हेक्टर आहे. गेल्या वर्षी १२३.७१ लाख हेक्टरवर लागवड झाली होती, यंदा ११२.७६ लाख हेक्टरवर लागवड झाली आहे.

एकीकडे लागवडी खालील क्षेत्रात घट झालेली असतानाच कापूस पिकाला अति पावसाचा फटका बसला आहे. गुजरातमधील सौराष्ट्र जिल्ह्यात कापूस उत्पादन जास्त होते. शंकर – सहा, या लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन फक्त सौराष्ट्रातच होते. ऑगस्टअखेरीस आलेल्या आसना चक्रीवादळाने सौराष्ट्रला



मोठा तडाखा बसला. त्यात सौराष्ट्रामधील कापूस पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील कापूस पिकाला पावसाळ्यातील अतिवृष्टी, परतीचा पाऊस आणि बिगर मोसमी पावसाचा फटका बसला आहे. आता दक्षिणेत ईशान्य मोसमी वाऱ्याचा जोर वाढल्यामुळे दक्षिण कर्नाटकातील विजयपूर, गुलबर्गा, बागलकोट परिसरातील कापूस पीक धोक्यात आले आहे. वेचणीला आलेल्या कापसाचा लगदा होत आहे. काढलेल्या कापसात ओलावा जास्त राहिल्यामुळे कापूस कुजत आहे. बुरशी लागून काळा पडत आहे. त्यामुळे शेतकरी आणि व्यापारी आणि जिनिंग- प्रेसिंग मिलही अडचणीत आल्या आहेत, अशी माहिती महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी यांनी दिली. एकूणच घटलेली लागवड आणि काढणीच्या वेळी सुरू असलेल्या पावसामुळे देशाच्या एकूण कापूस उत्पादनात सात टक्क्यांनी घट होऊन ३१७.९५ लाख गाठी कापूस उत्पादन होण्याचा अंदाज सीएआयने व्यक्त केला आहे. गेल्या वर्षी देशात ३२५ गाठींचे उत्पादन झाले होते.

नैसर्गिक आपत्तीमुळे यंदा गुजरात मधील कापूस उत्पादनात मोठी घट होण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी गुजरातमध्ये ९० लाख ५० हजार गाठींचे उत्पादन झाले होते. यंदा ८० लाख गाठींपर्यंत उत्पादन खाली येण्याचा अंदाज आहे. पंजाब, हरियाना, राजस्थानमधील उत्पादनात ९ लाख ६२ हजार गाठींची घट होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रातही उत्पादन काहीसे कमी होईल. तेलंगणा, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, ओडिशातील उत्पादनातही घटीचा अंदाज सीएआयने व्यक्त केला.

## परिचारिका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ; ३० नोव्हेंबरपर्यंत घेता येणार प्रवेश

**■ मुंबई : यश सावंत**

भारतीय परिचर्या परिषदेने पारिचारिकाविषयक विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे परिषदेने जाहीर केले आहे. त्यानुसार बीएस्सी नर्सिंग, एम.एस्सी. नर्सिंग, सहाय्यक परिचारिका प्रसाविका (एएनएम), सामान्य परिचर्या व प्रसाविका (जीएनएम), पदवीपूर्व सामान्य नर्सिंग (पीबीबीएस्सी नर्सिंग), पोस्ट बेसिक डिप्लोमा आणि क्रिटिकल केअरमधील पारिचारिका अभ्यासक्रम (एनपीसीसी) आदींसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहे.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी परिचारिकाविषयक विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू आहे. सप्टेंबरमध्ये प्रवेश परीक्षा अखेरच्या टप्प्यात असताना भारतीय परिचर्या परिषदेने या संपूर्ण प्रवेश प्रक्रियेला एक महिन्याची मुदतवाढ दिली होती. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ३१ ऑक्टोबरपर्यंत या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाला मुदतवाढ दिली होती. ही मुदत संपत आली असताना भारतीय परिचर्या परिषदेने पुन्हा एकदा परिचारिकाविषयक बीएस्सी नर्सिंग, एम.एस्सी. नर्सिंग,



सहाय्यक परिचारका प्रसाविका (एएनएम), सामान्य परिचर्या व प्रसाविका (जीएनएम), पदवीपूर्व सामान्य नर्सिंग (पीबीबीएस्सी नर्सिंग), पोस्ट बेसिक डिप्लोमा आणि क्रिटिकल केअरमधील परिचारिका अभ्यासक्रम (एनपीसीसी) आदींमध्ये प्रवेश घेण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र ही मुदतवाढ देताना परिषदेने काही मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून, त्याचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना परिचारिका महाविद्यालये व संस्थांना दिल्या आहेत. ३१ ऑक्टोबरपर्यंत झालेले प्रवेश नियमित वर्गातील प्रवेश समजण्यात यावेत. तर १ ते ३० नोव्हेंबरदरम्यान होणारे प्रवेश हे अनियमित वर्ग समजण्यात येणार आहेत. मात्र मुदतवाढीनंतर प्रवेशाच्या संख्येत वाढ होणे आवश्यक आहे. मात्र विद्यार्थ्यांची संख्या एकूण जागांपेक्षा अधिक असता कामा नये, अशा सूचना भारतीय परिचर्या परिषदेने दिल्या आहेत. तसेच यानंतर पुन्हा प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद महाविद्यालयांनी घ्यावी, असे परिषदेने स्पष्ट केले आहे. बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी १ ते ३० नोव्हेंबरदरम्यान प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनियमित वर्गासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेण्यात यावी.

## ‘अजित पवार मर्द असतील तर...’, जितेंद्र आव्हाड यांचे आक्षेपार्ह विधान; अजित पवार गटाचा पलटवार

**■ मुंबई : विशेष प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते, मुंब्रा-कळव्याचे आमदार जितेंद्र आव्हाड हे अजित पवार यांचे कडवे विरोधक राहिलेले आहेत. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी अनेकदा अजित पवारांवर जहाल टीका केली आहे. काल मुंब्रा-कळव्यात एका जाहीर सभेला संबोधित करत असताना आव्हाड यांनी अजित पवारांबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप केला जात आहे. अजित पवार गटाच्या वतीने अनेकांनी पुढे येऊन जितेंद्र आव्हाड यांच्या विधानावर टीका केली आहे. अजित पवार गट हा पाकिटमारांची टोळी असल्याचे आव्हाड म्हणाले. तसेच हिंमत असेल तर स्वतःचा वेगळा पक्ष काढून



निवडणुकीला सामोरे जायला हवे होते, असेही ते म्हणाले.

मुंब्र्यात एका सभेत बोलत असताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, अजित पवारांचा गट हा पाकिटमारांची टोळी आहे. जर तुमच्यात हिंमत होती, तुम्ही मर्दाची औलाद होता, तर मग तुम्ही स्वतःचे वेगळे चिन्ह घेऊन निवडणूक लढवून दाखवायला हवी होती. मग आम्ही तुम्हाला मर्द समजले असते. ज्या काकांनी देशभरात स्वतःचा पक्ष पसरवला आणि वाढवला. त्या पक्षाला तुम्ही माझं माझं म्हणत हिसकावून घेतलं. पण जनतेला सत्य माहीत आहे. जितेंद्र आव्हाड यांच्या विधानाचा समाचार घेताना छगन भुजबळ म्हणाले, ‘डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी याआधीही अनेकदा चुकीच्या शब्दांचा वापर केला होता, ज्यामुळे ते अडचणीत आले होते. हे त्यांनी लक्षात ठेवले पाहीजे. माझा त्यांना सल्ला आहे की, शब्द वापरण्याबाबत त्यांनी जाणीवपूर्वक विचार केला पाहीजे. आपण कुणाला चोर म्हणतो, कुणाला पाकिटमार म्हणतो, याचा त्यांनी विचार केला पाहीजे. तुमच्याबरोबर जे २० ते २५ वर्ष राहिले, त्यांना सर्वांना हे विधान लागू होते.’

## गोखले संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांचा राजीनामा

**■ पुणे : अकिल शेख**

गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांच्या त्या पदासाठीच्या पात्र-अपात्रतेचा मुद्दा गाजत होता. त्यावरून न्यायालयीन प्रक्रियाही पूर्ण झाल्यानंतर आता डॉ. रानडे यांनी कुलगुरू पदाचा राजीनामा दिला आहे. गोखले संस्थेचे कुलपती डॉ. संजीव सन्याल यांना त्यांनी राजीनाम्याचे पत्र दिले आहे.

गोखले संस्थेच्या कुलगुरू पदी डॉ. अजित रानडे असण्यावरून वाद निर्माण झाला होता. डॉ. रानडे यांच्याकडे या पदासाठी आवश्यक पात्रता नसल्याचा आक्षेप घेऊन तक्रारी करण्यात आल्या. तत्कालीन कुलपती डॉ. बिबेक देबराय यांनी सत्यशोधन समिती नियुक्त करून समितीच्या शिफारसीनुसार डॉ. रानडे यांची नियुक्ती रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयाला डॉ. रानडे यांनी न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाने डॉ. देबराय यांच्या निर्णयाला स्थगिती देत डॉ. रानडे यांना दिलासा दिला. त्यानंतर डॉ. देबराय यांनी कुलपती पदाचा राजीनामा दिला. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. संजीव सन्याल यांची कुलपती पदी नियुक्ती झाल्यावर त्यांनी डॉ. रानडे यांच्यावरील कारवाईचे पत्र मागे घेत असल्याचे न्यायालयाला कळवले. त्यानंतर या वादावर पडदा पडला होता. या पार्श्वभूमीवर डॉ. रानडे यांनी डॉ. सन्याल यांना राजीनाम्याचे पत्र सादर केले आहे. वैयक्तिक कारणास्तव राजीनामा देत आहे.



## जयंत पाटलांच्या अविचारी राजकारणाला पूर्णविराम द्या - सदाभाऊ खोत

**■ सांगली: सम्यक कासारे**

अनेक वर्षे आमदार व मंत्रीपदाचा वापर कारखानदारी वाढविण्यासाठी करणाऱ्या जयंत पाटील यांच्या अविचारी राजकारणाला पूर्णविराम देण्यासाठी शेतकऱ्यांनी महायुतीचे उमेदवार निशिकांत पाटील (दादा) यांना मोठे मताधिक्य देऊन विधानसभेत पाठवावे, असे आवाहन आ. सदाभाऊ खोत यांनी केले.

इस्लामपूर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार पाटील यांच्या प्रचारार्थ बावची, पोखर्णी,




ढवळी, बागणी, भडखंबे, नागाव, कोरेगाव, फार्णेवाडी (शि), शिगाव, रोझावाडी, फाळकेवाडी, गोटखिंडी येथे जुने कार्यकर्ते, तरुण मतदार यांच्या गाठी-भेटी दरम्यान आयोजित बैठकीत ते बोलत होते.

आ. खोत म्हणाले, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात भौगोलिक परिस्थितीत फारसा बदल नाही. असे असले तरी सांगली जिल्ह्यात जादा साखर उतारा असणारे अनेक कारखाने आहेत. तरीही कोल्हापूर जिल्ह्याच्या बरोबरीने ते दर देत नाहीत. आ. पाटील अनेक वर्षे ते जिल्ह्यातील ऊसदर कोंडी फोडण्यापासून पळ काढत असल्याचे आपण पाहिले आहे. ते शेतकऱ्यांची गळचेपी करून आपल्या सोयीप्रमाणे ऊस दराचा फॉर्म्युला बनवतात. यातून ऊस पुरवठादाराचे कसे शोषण होईल हेच धोरण त्यांचे असते, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. उमेदवार श्री. पाटील म्हणाले, येथील विद्यमान आमदार जिल्ह्यातील दुसऱ्या कारखान्यांनाही दर देऊ देत नाहीत. त्यांच्यावर दबावतंत्र अवलंबतात. त्यांच्या राजारामबापू कारखान्याच्या साखराळे, वाटेगाव व कारंदवाडी या तीन युनिटमधूनच ऊस दराचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत असतो.

## सांगली, मिरजेच्या रणांगणात ‘लाडक्या बहिणी’ची चर्चा!

### रिंगणातून बाजूला करण्याचे प्रयत्न

**■ सांगली : प्रथमेश चव्हाण**

‘काट्याच्या आणीवर वसली तीन गावं, दोन ओसाड, एक वसेचना’ अशी संत एकनाथ यांच्या भारूडातील गावप्रमाणे जिल्ह्यात लाडक्या बहिणींची अवस्था सर्वच राजकीय पक्षांनी केली आहे. जिल्ह्यातील विधानसभेच्या आठ जागांसाठी छाननीनंतर १८४ उमेदवार उरले असून, यापैकी एकाही राजकीय पक्षाने महिलांना संधी तर दिलीच नाही. मात्र, अपक्ष या पाच महिला उमेदवार आहेत. आता उमेदवारी माघारीच्या मुदतीपर्यंत कोण मैदानात राहते हे सोमवारी स्पष्ट होणार आहे.

मिरज मतदारसंघातून चार महिला रिंगणात उतरल्या आहेत. यामध्ये पालकमंत्री सुरेश खाडे यांच्या पत्नी सुमनताई खाडे यांच्यासह जैनब पिरजादे, ज्योती कांबळे, स्टेला गायकवाड यांचा समावेश आहे. तर पलूस मतदारसंघामध्ये



म्हणून मैदानात उतरलेल्या १० महिलांनाही रणांगणातून बाजूला करण्याचे हस्ते, परहस्ते प्रयत्न सुरू आहेत.

सांगली विधानसभा मतदारसंघात माजी मंत्री मदन पाटील यांच्या पत्नी आणि जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री पाटील यांनी काँग्रेसकडे उमेदवारी मागितली होती. मात्र, त्यांना डावलण्यात आल्याने त्यांनी बंडखोरी करत उमेदवारी दाखल केली आहे. सांगलीत त्यांच्या नामसाधर्म्याचा लाभ उठविण्याच्या हेतूने आणखी तीन महिला उमेदवार जयश्री पाटील या नावाच्या आहेत.

सांगली मतदारसंघामध्ये जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री मदन पाटील, जयश्री (वहिनी) जगन्नाथ पाटील, जयाश्रीताई पाटील आणि मिनाक्षी विलास शेवाळे या चार महिला आणि बहुजन समाज पार्टीने अधिकृत उमेदवार दिलेल्या आरती सर्जेराव कांबळे शंकुतला शशिकांत पवार या एकमेव महिला उमेदवार आहेत. अन्य पाच विधानसभा मतदारसंघात एकही महिला उमेदवार नाही. एकाही राजकीय पक्षाकडून महिलांना उमेदवारी न देता एकमेव मातब्बर उमेदवार म्हणून मैदानात उतरलेल्या सांगलीतील जयश्री पाटील यांची उमेदवारी मागे कशी घेतली जाईल, याचीच मोर्चेबांधणी मात्र सध्या काँग्रेसकडून सुरू आहे. अद्याप त्यांची अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची भूमिका असली तरी सोमवारनंतरच खरे काय ते स्पष्ट होणार आहे. जिल्ह्यात यापूर्वी कळंत्रे अक्का (१९५२), लोकसाहित्याच्या अभ्यासिका सरोजिनी बाबर (१९५२), शालिनीताई पाटील (१९८०) आणि सुमनताई आरआरआबा पाटील (२०१४) व (२०१९) या महिलांनी विधीमंडळात प्रतिनिधित्व केले आहे.

## हेल्मेट नसल्यास अधिकारी, कर्मचाऱ्यांना महापालिकेत मज्जाव

**■ पिंपरी-चिंचवड : महेश पानसरे**

दुचाकी वापरणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हेल्मेट घालूनच प्रवास करावा. महापालिकेत येतानाही हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. जे अधिकारी-कर्मचारी दुचाकी चालवताना हेल्मेट घालणार नाहीत, त्यांच्या दुचाकीला महापालिका आवारात प्रवेश देऊ नये. तसेच वाहनतळात जागाही उपलब्ध करून देऊ नये, असा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी सुरक्षा विभागाला दिला आहे. पुणे विभागीय कार्यालयांतर्गत सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद, महाविद्यालये, तसेच शासकीय यंत्रणांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना दुचाकी वापरताना हेल्मेट वापरणे बंधनकारक केले होते. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका आस्थापनेवरील




अधिकारी-कर्मचाऱ्यांसह अन्य शासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे महापालिका आयुक्त सिंह यांनी हेल्मेटसक्तीबाबत आदेश दिला आहे. महापालिकेतील दुचाकी वापरणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हेल्मेट घालूनच प्रवास करावा. महापालिकेत येतानाही हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. जे अधिकारी-कर्मचारी दुचाकी चालवताना हेल्मेट घालणार नाहीत, त्यांच्या दुचाकीला महापालिका आवारात प्रवेश देऊ नये, वाहनतळात जागाही उपलब्ध करून देऊ नये, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित विभागप्रमुखांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग केल्याबद्दल दंडात्मक कारवाई करावी. त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नोंदी कराव्यात, असेही आदेशात म्हटले आहे.

## ‘विधानसभेच्या निवडणुकीनंतर ओबीसी आरक्षण थांबवलं जाणार’, प्रकाश आंबेडकर यांचा मोठा दावा

**■ मुंबई : सम्यक कासारे**

महाराष्ट्रात सध्या विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. येणाऱ्या २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे देशाचं लक्ष लागलेलं आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. दरम्यान, ऐन निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाष आंबेडकर यांनी एक मोठं विधान केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

प्रकाश आंबेडकर यांच्यावर ॲंजिओग्राफी आणि ॲंजिओप्लास्टी करण्यात आलेली आहे. ते सध्या पुण्यातील एका रुग्णालयात उपचार घेत आहेत. मात्र, त्यांनी वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत एक्सवर (ट्विटर) एक व्हिडीओ शेअर



करत मोठा दावा केला आहे. ‘विधानसभेच्या निवडणुकीनंतर ओबीसींचं आरक्षण थांबवलं जाणार आहे’, असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह आरक्षणवादी कार्यकर्त्यांना वंचित बहुजन आघाडीच्या पाठिमागे उभं राहण्याचं आवाहन केलं आहे.

‘मी सध्या आयसीयूमध्ये आहे. ॲंजिओग्राफी आणि ॲंजिओप्लास्टी दोन्हीही झालेली आहेत. आता विधानसभेच्या निवडणुकीला सुरुवात झालेली आहे. ही निवडणूक खूप महत्त्वाची आहे. ओबीसीसाठी देखील महत्वाची आहे. कारण विधानसभेनंतर ओबीसींचं आरक्षण थांबवलं जाणार आहे. तसेच दुसऱ्या बाजूला एसीसीच्या आरक्षणाची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे ही निवडणूक महत्वाची आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत आपले आमदार निवडून आले तर त्या ठिकाणी आरक्षणावरचा हल्ला थांबवता येईल.

## ‘मुंब्रा येथे जाऊन जितेंद्र आव्हाडांना...’, मिटकरींचं आव्हान; अजित पवारांवरील टीकेनंतर संताप व्यक्त करत म्हणाले...

**■ मुंबई : राकेश गायकवाड**

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते आणि मुंब्रा-कळव्याचे आमदार जितेंद्र आव्हाड हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कडवे विरोधक मानले जातात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर अजित पवारांनी सातत्याने शरद पवारांवर व त्यांच्या पक्षावर टीका केली आहे. या टीकेला प्रत्येक वेळा जितेंद्र आव्हाड यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांनी अनेकदा अजित पवारांवर जहाल टीका केली आहे. दरम्यान, शनिवारी (२ नोव्हेंबर) मुंब्रा-कळव्यात एका जाहीर सभेला संबोधित करताना आव्हाड यांनी अजित पवारांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याची टीका होत आहे. त्यानंतर अजित पवारांच्या पक्षातील अनेक नेत्यांनी पुढे येऊन जितेंद्र आव्हाड यांच्या वक्तव्यावर टीका केली आहे. अजित पवारांचा



गट ही पाकिटमारांची टोळी असल्याचं आव्हाड म्हणाले होतं. तसेच हिंमत असेल तर त्यांनी स्वतःचा वेगळा पक्ष काढून, नव्या निवडणूक चिन्हासह त्यांनी निवडणुकीला सामोरे जायला हवं होतं, असंही आव्हाड म्हणाले म्हणाले.

यावर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) विधान परिषद सदस्य व अजित पवारांचे निकटवर्तीय अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मिटकरी यांनी आव्हाडांचा एकेरी उल्लेख करत त्यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, खालच्या भाषेत बोलण्याची जितेंद्र आव्हाडाची संस्कृती आहे. ‘विंचवाची नांगी तैसें दुर्जन सर्वांगी’, या अभंगात्तील ओळीप्रमाणे हा (जितेंद्र आव्हाड) दुर्जन व्यक्ती आहे. त्याच्या नसानसांमध्ये विष भरलं आहे. अजित पवारांच्या वडिलांबद्दल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबद्दल (अजित पवार) आव्हाडाने ज्या पद्धतीने टीका केली आहे, ते पाहता मला वाटतं की त्यालाही त्याच भाषेत उत्तर दिलं पाहिजे. शरद पवारांनाही खरंच वाटत असेल की जितेंद्र आव्हाडांनी अनंत पवारांचा अपमान केला आहे तर त्यांनी जितेंद्र आव्हाडला बारामतीला बोलावून घ्यावं आणि पायातलं पायतान काढून त्याचं थोबाड रंगवावं. अन्यथा मुंब्रा-कळव्यात जाऊन आम्ही आव्हाडला त्याची औकात दाखवणार.

जितेंद्र आव्हाड मुंब्र्यातील सभेत म्हणाले होते, अजित पवारांचा गट हा पाकिटमारांची टोळी आहे. जर तुमच्यात हिंमत होती, तुम्ही मर्दाची औलाद होता, तर मग तुम्ही स्वतःचं वेगळं निवडणूक चिन्ह घेऊन निवडणूक लढवून दाखवायला हवी होती. मग आम्ही तुम्हाला मर्द समजलो असतो.

# जैव-प्लास्टिकही पर्यावरणाला हानीकारक; जाणून घ्या, येल स्कूल ऑफ एनवायरमेंटच्या अभ्यासातील धक्कादायक निष्कर्ष

■ मुंबई : गणेश बागडे

**प्लास्टिकमुळे होणारी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी जैविक विघटन होणाऱ्या जैव - प्लास्टिकचा प्रचार - प्रसार केला जात आहे. पण, जैव - प्लास्टिकही पर्यावरणाला हानीकारकच आहे. जैव प्लास्टिक म्हणून विकले जाणारे प्लास्टिक अनेकदा जैविक नसते, असा दावा येल स्कूल ऑफ एनवायरमेंटच्या सेंटर फॉर इंडस्ट्रियल इकोलॉजीच्या अभ्यासात करण्यात आला आहे.**

सेंटर फॉर इंडस्ट्रियल इकोलॉजीच्या अहवालात म्हटले आहे, दरवर्षी जागतिक पर्यावरणात सुमारे दोन कोटी टन प्लास्टिकची भर पडते. त्यातील सूक्ष्म प्लास्टिक मानव, वन्यजीव आणि पशूधनासाठी हानीकारक ठरते आहे. त्यामुळे प्लास्टिकला पर्याय म्हणून आणि पर्यावरण पूरक प्लास्टिक म्हणून जैविक घटकांचा वापर करून तयार करण्यात आलेल्या आणि जैविक विघटन होणाऱ्या प्लास्टिकचा प्रचार – प्रसार केला जात आहे. आजवर हे जैविक प्लास्टिक पर्यावरणाला किती हानीकारक आहे. याची तपासणी करणारे संशोधन विकसीत झालेले नव्हते.

येल स्कूल ऑफ एनवायरमेंटच्या सेंटर फॉर इंडस्ट्रियल इकोलॉजीचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी जैविक विघटन होणाऱ्या प्लास्टिकमुळे पर्यावरणाची किती हानी होते, याचे मोजमाप करणारी एक पद्धत विकसीत केली आहे. त्या बाबतचा संशोधनात्मक लेख नेचर केमिकल इंजिअनिरिंग मध्ये प्रकाशीत झाला आहे. त्यानुसार, जैविक विघटन होणारे किंवा जैव प्लास्टिक म्हणून विकल्या जाणाऱ्या प्लास्टिकपैकी फक्त ५० टक्केच प्लास्टिक खऱ्या अर्थाने जैविक विघटन होणारे प्लास्टिक आहे. मात्र, अन्य प्लास्टिक जैविक नाही, त्याचे जैव विघटन होत नाही. जैविक प्लास्टिक तयार करताना प्रामुख्याने कृषी कचरा किंवा पिकांच्या उर्वरीत अवशेषांचा वापर करण्याची गरज आहे. पण, अनेक कंपन्या पेट्रोलियम पदार्थांचा वापर करतात आणि जैव प्लास्टिक असल्याचा दावा करतात, ही एक प्रकारची फसवणूक आहे.



सामान्य प्लास्टिकचे विघटन होताना पर्यावरणाची जितकी हानी होते, तितकीच हानी जैव प्लास्टिकमुळेही होते. जैव – प्लास्टिकचे विघटन होताना कार्बन डायऑक्साइड, मिथेन, नायट्रस ऑक्साइड सारखे घातक वायू पर्यावरणात उत्सर्जित होतात. मिथेन, कार्बन डायऑक्साईड सारखे वायू जागतिक तापमान वाढीला हातभार लावतात. शिवाय प्लास्टिकचे विघटन होताना प्रथम प्लास्टिकचे लहान-लहान कण तयार होतात. हे कण माती, पाणी आणि समुद्रात अनेक वर्ष टिकून राहतात. हे लहान कण विविध मार्गाने मानव, वन्यप्राणी आणि पशूधनाच्या पोटात जातात. त्याचे वाईट परिणाम समोर येऊ लागले आहेत.

सामान्य किंवा जैव प्लास्टिक तयार करताना प्लास्टिकचे वेगाने आणि सहजपणे विघटन व्हावे, असा प्रयत्न असल्याचे प्लास्टिक उद्योगाकडून सांगितले जाते. प्रत्यक्षात उत्पादीत होणारे प्लास्टिक तसे असत नाही. ते जास्त काळ टिकणारे असल्याचे दिसून येते. त्यामुळे यापुढे कंपन्यांनी किमान जैविक विघटन होणाऱ्या जैव – प्लास्टिकचे वेगाने आणि सहजपणे विघटन होईल, अशा जैविक घटकांचा उपयोग करून जैव – प्लास्टिक निर्मितीवर, उत्पादनांवर भर दिला पाहिजे. त्या दृष्टीने प्लास्टिक उद्योगाने संशोधन करण्याची आणि उत्पादन पद्धतीत बदल करण्याची गरज आहे, असेही अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १,०३२ गुन्हेगारी व्यक्तींना प्रतिबंधात्मक नोटीस

■ कर्जत : यश सावंत

आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व मतदान केंद्रावर मतदान सुरळीतपणे पार पडावे यासाठी पोलिस प्रशासनाकडून सर्व तयारी पूर्ण झाली असून मतदारांनीदेखील शंभर टक्के मतदान करावे असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी विवेकानंद वाखारे यांनी केले आहे.

यावेळी पत्रकारांना माहिती देताना वाखारे म्हणाले की, कर्जत उपविभाग अंतर्गत येणाऱ्या कर्जत, मिरजगाव, श्रीगोंदा, बेलवंडी, जामखेड व खर्डा या सर्व पोलिस ठाण्याअंतर्गत पोलिस प्रशासनाच्या तयारीच्या कामाचा आढावा घेतला आहे. मतदान सुरळीत आणि शांततेने पार पडावे यासाठी कर्जत उप विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व पोलिस ठाण्यांमधून गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या १,०३२ गुन्हेगारी व्यक्तींना प्रतिबंधात्मक नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्यांच्यावर कारवाईची प्रक्रियादेखील सुरू आहे.

उपविभागातील कर्जत, मिरजगाव, श्रीगोंदा बेलवंडी, जामखेड व खर्डा या ठिकाणी




पोलिस व राखीव दलाच्या पोलिस तुकड्यांच्या माध्यमातून संवेदनशील भागांसह सर्वत्र पोलिस पथकाने संचलन केले आहे. या माध्यमातून नागरिकांनी निभऱ्यपणे मतदान करावे, तसेच अनुचित प्रकार करणाऱ्यांना या माध्यमातून इशारा देण्यात आला आहे. सर्वांनी शासनाच्या नियमाप्रमाणे आदर्श आचारसंहितेचे पालन करावे. सोशल मीडियाचा वापर करताना कोणत्याही प्रकारे भावना दुखावतील अशा पद्धतीचे वर्तन असू नये. कोणतीही आगळीक करण्याचा कोणी प्रयत्न केला तरीदेखील त्याची गय केली जाणार नाही, असे वाखारे म्हणाले.

मतदान करणे हे पवित्र कार्य आहे आणि प्रत्येक नागरिकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावावा. सध्या दिवाळीचा सण आहे, नागरिकांनी आनंदाने व शांततेने सण साजरा करावा. फटाके फोडताना काळजी घ्यावी, आनंदावर विर्जण पडणार नाही अशा पद्धतीचं सर्वांचे वर्तन असावे. आपल्या किमती वस्तू, मालमत्ता यांचे सर्वांनी संरक्षण करावे. गर्दीमध्ये जाताना महिलांनी काळजी घ्यावी.

# महायुतीत भाजपा मोठा भाऊ होतेय? अजित पवार प्रश्नावर म्हणाले, 'आमचं सहमतीनं...'

■ मुंबई : सम्यक कासारे

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात महाविकास आघाडी व महायुती यांच्या जागावाटपाची जोरदार चर्चा पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी इच्छुक नाराज झाल्याचं चित्र आहे. काही ठिकाणी उमेदवार अदलाबदली करून तात्पुरता प्रश्न सोडवण्यात आला तर काही ठिकाणी थेट आपला उमेदवार मित्रपक्षात प्रवेश करून त्यांच्या चिन्हावरच उभा करण्याचा मार्ग निवडण्यात आला. आता शिवसेना (एकनाथ शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातले मिळून १७ उमेदवार भाजपातून आयात असल्याचं दिसून आलं आहे. याबाबत अजित पवारांना प्रश्न विचारला असता त्यांनी त्यावर भूमिका मांडली. तसेच, येत्या ४ तारखेपासून राज्यभर प्रचार करणार असल्याचंही अजित पवारांनी सांगितलं.

निवडणुकीपर्यंत महाराष्ट्रात रोज तीन प्रचारसभा घेण्याचं नियोजन असल्याचं अजित पवारांनी सांगितलं. तसेच, तोपर्यंत बारामती विधानसभा मतदारसंघातील किमान ५० टक्के गावांमध्ये जाण्याचं नियोजनही त्यांनी सांगितलं. 'प्रत्येक गावात एकदा का होईना उपस्थित राहून मतदानाचं आवाहन करण्याचा माझा प्रयत्न होता. आत्तापर्यंत



माझी २५ टक्के गावंच झाली आहेत. उद्या पाडवा आहे. त्यानंतर पुन्हा मी २५ टक्के गावं तरी करणार. म्हणजे माझी ५० टक्के गावं होतील. ४ तारखेपासून महाराष्ट्रभरात आमच्या प्रचारसभा होतील', असं अजित पवार म्हणाले. दरम्यान, पक्षाकडून काही मतदारसंघांमध्ये दोन एबी फॉर्म देण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित होताच अजित पवारांनी त्यावर स्पष्टीकरण दिलं. यावेळी त्यांनी नवाब मलिक यांचाही उल्लेख केला. 'नवाब मलिकांनी आधीपासून त्यांचं मत सांगितलं आहे. त्यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. ही बाबही खरी आहे की काही ठिकाणी दोन फॉर्म दिले गेले आहेत. फॉर्म भरण्याच्या दिवशीच्या आदल्या दिवशी रात्री ९ ते २ वाजेपर्यंत आम्ही वर्षावर होतो. त्यातून माहिती घेण्याचा प्रयत्न केला की कुठे-कुठे एबी फॉर्म दोनदा दिले गेले? कुठे एबी फॉर्म न देता वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या लोकांनी अपक्ष म्हणून फॉर्म भरले? काहीजणांनी फॉर्म भरले, पण पक्षाचा एबी फॉर्म न मिळाल्यामुळे त्यांचा अपक्ष फॉर्म ग्राह्य धरला गेला', असं ते म्हणाले. दिवाळीचे दिवस संपले की आम्ही भाऊबीजेच्या दिवशीपासून ज्यांनी माघार घ्यायची त्यांना फोन करणार म्हणजे ते ४ तारखेला फॉर्म वेळेत मागे घेतील', अशी माहिती अजित पवारांनी दिली. शरद पवारांकडून अजित पवारांवर प्रचारात भावनिक मुद्दे उपस्थित केल्याची टीका करण्यात आली होती. त्यावर अजित पवार म्हणाले, 'शरद पवार मोठी व्यक्ती आहेत. आदरणीय व्यक्ती आहेत. त्यांनी काय बोलावं हा त्यांचा अधिकार आहे. निवडणूक आयोगानं सर्व गोष्टी पाहिल्या. त्यावेळी जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी आमच्याकडे होते. त्यामुळे पक्षचिन्ह आम्हाला मिळालं. पक्ष वाढवण्यात माझा, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल अशा आमचाही खारीचा वाटा आहेच. पण जाऊ द्या, आदरणीय व्यक्तीनं एखादी गोष्ट बोलली आणि त्यावर आम्ही काही बोललो तर त्यातून नवीन प्रश्न निर्माण होतात', असं अजित पवार म्हणाले. दरम्यान, यावेळी जागावाटपाच्या चर्चेमध्ये अधिक जागा पदरात पाडून घेऊन भाजपा मोठा भाऊ होऊ पाहतेय का? अशी विचारणा केली असता त्यावरही अजित पवारांनी उत्तर दिलं.

# पुण्याची हवा धोकादायक पातळीवर

■ पुणे : अभिजीत येरल्लू

दिवाळीनिमित्त झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीने शहर आणि उपनगरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे. काही भागातील हवा तर धोकादायक पातळीवर पोहोचली असून, धोकादायक स्तरातील हवेमुळे



श्वसनास त्रास होण्यासह आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात.

धुलिकणांचे हवेतील प्रमाण वाढल्यावर हवेची गुणवत्ता बिघडते. फटाके, बांधकामे अशा विविध कारणांनी हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. शुक्रवारी लक्ष्मीपूजनानंतर शहर आणि उपनगरांमध्ये झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे हवेची गुणवत्ता बिघडली आहे. शुक्रवारी रात्रीच हवा गुणवत्ता निर्देशांक ११५च्या पुढे गेला होता. हवेच्या गुणवत्ता निकषानुसार ५० पर्यंत निर्देशांक असल्यास हवेची गुणवत्ता निर्धोक मानली जाते. समाधानकारक स्तरात ५१ ते १०० पर्यंत निर्देशांक असल्यास हवेतील काही प्रदूषणकारी घटक त्रासदायक ठरू शकतात. साधारण स्तरात १०१ ते २०० दरम्यान निर्देशांक असल्यास मुले आणि ज्येष्ठांना श्वसनासाठी त्रास होतो. वाईट स्तरात २०१ ते ३०० या दरम्यान निर्देशांक असल्यास सर्वांवरच त्याचा विपरीत परिणाम होतो. अतिवाईट स्तरात ३०० पेक्षा जास्त निर्देशांक असल्यास आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर उडवलेल्या फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला होता.

# 'सुरक्षेची भाऊबीज ओवाळणी' ऐवजी अंगणवाडी सेविकांना कारवाईची नोटीस

■ पुणे : अकिल शेख

अहिल्यानगर जिल्ह्यात अत्याचाराला विरोध करणाऱ्या अंगणवाडी सेविकेचा खून करण्यात आला. अंगणवाडी सेविकेच्या खून प्रकरणी आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अंगणवाडी शिक्षिका, मदतनीसांना सुरक्षेची भाऊबीज ओवाळणी द्यावी, अशी मागणी अंगणवाडी कर्मचारी सभेने केली. त्यासाठी येत्या सोमवारी (४ नोव्हेंबर) जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात येणार होते. मात्र, बंडगार्डन पोलिसांनी महिला अत्याचाराच्या गंभीर प्रश्नाची गंभीर दखल घेण्याऐवजी कायदा आणि सुव्यवस्थेची सबब सांगून निवेदन देणाऱ्या अंगणवाडी सेविकांना पोलिसांनी कारवाईची नोटीस बजावली आहे.

अंगणवाडी शिक्षिका, मदतनीस विविध शासकीय योजनांमध्ये सहाय करतात. देशाच्या विकासासाठी त्या काम करतात. यापूर्वी अंगणवाडी सेविकांना अत्याचाराच्या घटनांना सामोरे जावे लागले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील एका गावातील अंगणवाडी सेविकेवर



आरोपी सुभाष बडे याने २४ ऑक्टोबर रोजी अत्याचाराचा प्रयत्न केला होता. अत्याचाराला विरोध करणाऱ्या अंगणवाडी सेविकेचे भिंतीवर डोके आपटून बडे याने खून केला होता. आरोपीने पुरावा नष्ट करण्यासाठी सेविकेचा मृतदेह नदीपात्रात फेकून दिला. अशा घटना रोखण्यासाठी अंगणवाडी सेविकांना सुरक्षेची भाऊबीज ओवाळणी देण्यात यावी, असे निवेदन अंगणवाडी कर्मचारी सभेकडून येत्या जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांना देण्यात येणार होते. अंगणवाडी कर्मचारी सभेकडून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या घटनेचा निषेध करण्यात येणार होता.

याबाबतची माहिती देण्यासाठी अंगणवाडी कर्मचारी सभेच्या पदाधिकारी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गेल्या. तेव्हा अशा प्रकारचे आंदोलन करता येणार नाही. आंदोलन केल्यास कारवाई करण्यात येईल, अशी नोटीस बंडगार्डन पोलिसांनी पदाधिकारी शैलजा चौधरी, वैशाली गायकवाड, मनीषा गाडे, अनिता आवळे यांना दिली. अंगणवाडी सेविकांना सुरक्षेची ओवाळणी देण्याऐवजी कारवाईची नोटीस बजाविणे योग्य नाही, असे अंगणवाडी कर्मचारी सभेचे अध्यक्ष नितीन पवार यांनी सांगितले.

# भाजपाच्या 'या' १७ जणांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतून मिळवलं तिकिट, वाटीतलं ताटात आणि ताटातलं वाटीत!

■ मुंबई : विशाल कारंडे

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचं घोडामैदान अगदी जवळ येऊन ठेपलं आहे. दिवाळी संपली की महाविकास आघाडी आणि महायुती दोहोंचे प्रचार सुरु होतील. या दरम्यान जागावाटपाचं घोडं एकदाचं गंगेत न्हायलं आहे. मात्र त्यातही कुठे नाराजी तर कुठे बंडखोरी तर कुठे पक्ष सोडून तिकिट देणाऱ्या 'आपल्या' पक्षात जाण्याचा जोर वाढला आहे. भाजपातले १७ इच्छुक असे आहेत ज्यांच्यापैकी कुणी अजित पवारांच्या पक्षात जाऊन तिकिट मिळवलं तर कुणी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जाऊन. आम्ही महायुती म्हणजे ताटातलं वाटीत आणि वाटीतलं ताटात असं एकनाथ शिंदे म्हणाले होते. मात्र भाजपाने निवडणुकीच्या जागांमध्ये १५२+ १७ अशी १६९ जागांची बाजी मारली आहे. ही संख्या भाजपाचे उमेदवार आणि त्यांच्या पक्षातून दोन मित्र पक्षांत गेलेल्या उमेदवारांची आहे.

भाजपाच्या १२ इच्छुकांनी एकनाथ शिंदेंच्या पक्षात प्रवेश केला आणि तिकिट मिळवलं. तर चार जणांनी अजित पवारांच्या पक्षात जाऊन तिकिट मिळवलं. आरपीआयच्या कोट्यातून एक जागा मिळाली आहे. तो उमेदवार भाजपाच्या कमळ या चिन्हावर निवडणूक लढवणार आहे.

निलेश राणे- कुडाळ
संजय जाधव दानवे-कणंद
राजेंद्र गावित-पालघर
विलास तरे, बोईसर
संतोष शेट्टी-भिवंडी
मुरजी पटेल-अंधेरी पूर्व
शायना एनसी-मुंबादेवी
अमोल खताळ-संगमनेर
अजित पिंगळे-धाराशिव
दिग्विजय बागल-करमाळा
विठ्ठल लांघे-नेवासा
बळीराम शिर्सेकर-बदलापूर

या १२ जणांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आणि तिकिट मिळवलं. हे मूळचे भाजपाचे उमेदवार होते. भाजपाच्या जागा जाहीर होताना हे उमेदवार शिवसेनेत गेले आणि त्यानंतर तिथून त्यांनी तिकिट मिळवलं. अजित पवारांच्या पक्षात कोण गेलं जाणून घेऊ.

अजित पवारांच्या पक्षात जाऊन तिकिट मिळवणारे चार जण कोण?
राजकुमार बडोले-अर्जुनी मोरगाव
प्रतापराव चिखलीकर-लोहा
संजयकाका पाटील-तासगाव
निशिकांत पाटील-इस्लामपूर

या एकूण १६ जागा झाल्या तर १७ वी जागा आरपीआयच्या कोट्यातून आहे. ती आहे अमरजित सिंग यांची. कलिनामधून ते निवडणूक लढवत आहेत.

मुरजी पटेल हे भाजपाचे माजी नगरसेवक होते. त्यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करताच त्यांना अंधेरी पूर्वमधून तिकिट देण्यात आलं आहे. तर मुंबादेवीतून शायना एनसींना शिवसेनेने तिकिट दिलं आहे. शायना एनसी या काँग्रेसच्या अमीन पटेल यांना टक्कर देतील. भिवंडीतही भाजपाचे नेते असलेले संतोष शेट्टी यांनी निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेत प्रवेश केला आणि तिकिट मिळवलं. संजना जाधव दानवे या भाजपाचे माजी मंत्री रावसाहेब दानवेंच्या कन्या. त्यांनी एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला आणि



निवडणुकीसाठी तिकिट मिळवलं. तर निलेश राणे हे देखील नारायण राणेंचे पुत्र जे भाजपात केंद्रीय मंत्री होते. त्यांनीही शिवसेनेत जाणं पसंत केलं. ज्यादिवशी त्यांच्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी रॅली घेतली तेव्हाच त्यांना तिकिट देणार असल्याचं जाहीर केलं. अगदी याचप्रमाणे राजकुमार बडोले, संजय काका पाटील, निशिकांत पाटील यांच्यासह प्रताप पाटील चिखलीकर यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाऊन तिकिट मिळवलं. त्यामुळे महायुती असली तरीही महाराष्ट्रात मोठा भाऊ आपणच हे भाजपाने दाखवून दिलं आहे.


# 'अजित पवारांना व्हिलन ठरवण्याचा प्रयत्न केला तर...', सुनील तटकरेंचा जयंत पाटलांना इशारा

■ मुंबई : गणेश बागडे

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे देशाचं लक्ष लागलेलं आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना पाहायला मिळणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. यातच अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी तासगावमध्ये झालेल्या एका सभेत कथित सिंचन घोटाळ्यासंदर्भात माजी गृहमंत्री दिवंगत आर.आर.पाटील यांच्याबाबत भाष्य केलं. त्यावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी अजित पवारांवर टीकेची झोड उठवली.

यावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही अजित पवारांवर निशाणा साधला. देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना ब्लॅकमेल केल्याचा आरोप जयंत पाटील यांनी केला. यावरून आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी जयंत पाटील यांना इशारा दिला आहे. 'अजित पवारांना व्हिलन ठरवण्याचा प्रयत्न कोणी करत असेल तर मला देखील पक्षांतर्गत अनेक गोष्टी बोलता येतात', असं सुनिल तटकरेंनी म्हटलं आहे.

'शरद पवार काय म्हणतात, याबाबत आम्ही काहीही बोलणार नाहीत. मात्र, महायुतीच्या सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केलेली आहे. त्या





योजनेबाबत संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांना आत्मीयता वाटते. लाडक्या बहिणींबाबत निर्माण झालेला विश्वास हा आमच्यासाठी महत्वाचा आहे. कारण निवडणुका येतात आणि जातात', असं सुनील तटकरे म्हणाले आहेत. सुनील तटकरे पुढे बोलताना म्हणाले की, '२०१४ साली निवडणुकीचा निकाल समोर यायच्या आधी आम्ही भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दिला होता. जेव्हा पाठिंबा देण्यात आला होता, त्यावेळी मी देखील स्वत: त्या ठिकाणी होतो. तेव्हा शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीवेळी मी (सुनील तटकरे), छगन भुजबळ, प्रफुल पटेल यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. मात्र, त्यावेळी जयंत पाटील त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांना काही गोष्टींची माहिती नसेल. २०१४ साली १६-१६- अशा पद्धतीचा फॉर्म्युला ठरला होता. पुढे २०१७ मध्ये आम्ही सत्तेतही सहभागी होणार होतो. तेव्हा जयंत पाटील यांना माहिती नव्हतं की, त्यांना कोणतं खातं मिळणार होतं. त्यामुळे त्यांनी आता टीका करण्यापेक्षा अशा प्रकारची वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. अन्यथा मला देखील अनेक गोष्टी माहिती आहेत. विनाकारण काहीही बोलून अजित पवारांना नेहमीप्रमाणे व्हिलन ठरवण्याचा प्रयत्न कोणी करणार असेल तर मला देखील पक्षांतर्गत अनेक गोष्टी बोलता येतात.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# पुण्यात कायदा-सुव्यवस्थेची ऐशी- तैशीः धारदार हत्यारांनी वार करत गाड्यांची तोडफोड

**■ पुणे : विशेष प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांमध्ये पुणे शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. कोयता गँग, हीट अँड रन, महिलांवरील अत्याचारांचे प्रकार, अपघाताची सत्र सुरूच आहेत. तर पुण्यात सायबर क्राईमच्या घटना देखील वाढलेल्या दिसत आहेत. दरम्यान पोलीस प्रशासन देखील याबाबत कठोर कारवाई करताना दिसून येत आहे. मात्र सातत्याने अशा घटना घडत असल्याने कायदा सुव्यवस्था आहे की नाही याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. चोरीच्या घटना अशा सर्वच प्रकारचे गुन्हे वाढताना पाहायला मिळत आहेत. धारदार हत्यारांनी वार करत गाड्यांची तोडफोड करून दहशत पसरविणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार कात्रज येथील सुंदरनगर परिसरात घडला. याप्रकरणी गणेश माळवे, यश घोडके व त्यांच्या एका साथीदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुमित मारूती पंडीत (वय २७, रा. सुंदरनगर, कात्रज) याने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा प्रकार २९ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास घडला. पोलिसांच्या माहितीनुसार, सुमित पंडीत आणि त्याचा भाऊ राहत्या घरासमोर बसले होते. त्यावेळी आरोपी अचानकपणे हातात हत्यार घेऊन आले. त्यांनी लागलीच सुमित यांच्या हातावर आणि पायावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच जवळच पार्क केलेल्या रिक्षा, चार चाकी गाड्यांया काचा फोडल्या. तर किशोर कुचेकर व मल्लिनाथ मळवडे यांना देखील मारहाणकरून जखमी केले. नंतर हत्यारे हवेत फिरवत दहशत माजवली, असे तक्रारीत म्हटले आहे. एकाच रात्रीत ५ दुकाने फोडली : पुण्यातील वर्दळीचा रस्ता म्हणून ओळख असलेल्या फर्ग्युसन रस्त्यावर एका रात्रीत पाच दुकाने फोडल्याची घटना घडली आहे. सध्या



दिवाळीमुळे पुणे शहरात गर्दी वाढली आहे. बाजारपेठेत , प्रमुख मार्गावर वर्दळ वाढली आहे. मात्र याचाच फायदा घेत चोरट्यांनी फर्ग्युसन रस्त्यावर दुकाने फोडली आहेत. चोरट्यांनी पुण्यातील प्रसिद्ध अशा फर्ग्युसन रस्ता आणि जंगली महाराज रस्त्यावरील दुकाने फोडली आहेत. एका रात्रीत एकूण ५ दुकाने चोरट्यांनी फोडल्याचे समोर आले आहे. उपलब्ध माहितीनुसार, चोरट्यांनी लाखोंचा माल लुटला आहे. जवळपास १.२५ लाख रुपये लुटल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. डेक्कन पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. अट्टल चोरट्यांनी दुकाने फोडली असल्याचा संशय पोलिसांना आहे. दोन गटांत हाणामारी : पुण्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे, पुण्यात दररोज गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत आहेत. यामुळे नागरिकांसोबतचं पोलिसही हैराण झाले आहेत. अशातच आता आळंदी रस्त्यावर असलेल्या कळस गावात पूर्ववैमनस्यातून दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना घडली आहे.

# पिंपरीत जेवण बनवण्यावरून वाद; लोखंडी रॉडने ११ घाव घालून केली हत्या

**■ पिंपरी : विशेष प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड मध्ये जेवण बनवण्याच्या वादावरून तरुणाची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पिंपरी पोलिसांनी आरोपी मुकेश हिरा कुसवाह ला अटक केली आहे. दिपू कुमार असं हत्या झालेल्या तरुणाच नाव आहे. हत्येची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुकेश हिरा कुसवाह आणि हत्या झालेला दिपू कुमार यांच्यासोबत इतर तीन तरुण चिंचवड मधील व्ही. के.व्ही कंपनीत काम करत होते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने दोन महिन्यापूर्वीच दिपू कुमार हा चिंचवडमधील कंपनीत काम करण्यास आला होता.




कंपनीत एकूण पाच जण काम करायचे आणि तिथेच राहायचे. जेवण ही तिथेच बनवून खात असायचे. परंतु, शुक्रवारी जेवण बनवण्यावरून मुकेश आणि दिपू यांच्यात वाद झाले. काही वेळानंतर सर्वजण जेवण करून झोपले. दिपू इतर दोन तरुणांसह झोपला. शनिवारी रात्री एकच्या सुमारास मुकेश कुसवाह झोपत नव्हता. तो सतत विचारात होता. त्याला दिपू कुमारचा राग आला होता. याच रागातून झोपेत असलेल्या दिपू कुमारच्या डोक्यात अवघ्या वीस सेकंदात ११ लोखंडी रॉडने वार करून हत्या केली. ही सर्व घटना कंपनीत लावलेल्या सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या घटनेनंतर पिंपरी पोलिसांनी मुकेश हिरा कुसवाह ला अटक केली आहे.

# दिवाळीच्या कालावधीत एसटी स्थानकांमध्ये चोरट्यांचा प्रवाशांना मनस्तापः लाखोंचा माल गेला चोरीला

**■ पुणे : विशेष प्रतिनिधी**

एसटी स्थानकात चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे. दिवाळीत प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. स्वारगेट एसटी स्थानकात ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील एक लाख रुपयांची सोनसाखळी चोरट्यांनी चोरुन नेली, तसेच छत्रपती संभाजीनगर परिसरातून पुण्याकडे येणाऱ्या एसटी प्रवासी महिलेच्या पिशवीतून ८८ हजारांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार नवी मुंबईतील ऐरोली परिसरातील रहिवासी आहेत. ते ३१ ऑक्टोबर सकाळी पावणेसहाच्या सुमारास स्वारगेट एसटी स्थानकातील फलाट क्रमांक नऊ परिसरात थांबले होते. एसटी बसमध्ये प्रवेश करताना ज्येष्ठाच्या गळ्यातील एक लाख रुपयांची सोनसाखळी चोरट्यांनी चोरून नेली. सोनसाखळी चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक आल्हाटे तपास करत आहेत. छत्रपती संभाजीनगर परिसरातून पुण्याकडे येणाऱ्या एसटी प्रवासी महिलेच्या पिशवीतून ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत महिलेने डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला छत्रपती संभाजीनगरमधील वाळुंज परिसरात राहायला आहेत. त्या




दिवाळीनिमित्त नातेवाईकांकडे आल्या होत्या. प्रवासादरम्यान त्यांच्या पिशवीतून मंगळसूत्र, रोकड, मोबाइल संच असा ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेण्यात आला. पोलीस हवालदार बोरकर तपास करत आहेत. दोन दिवसांपूर्वी शिवाजीनगर परिसरातील एसटी स्थानकाच्या आवारातून प्रवासी महिलेच्या पिशवीतून साडेतीन लाख रुपयांचे दागिने चोरून नेण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दिवाळीत एसटी स्थानकाच्या आवारात प्रवाशांकडील ऐवज चोरून नेण्याच्या घटना वाढतात.

# पुण्यात पुन्हा हिट अँड रन! रस्त्यावर फटाके फोडणाऱ्याला भरधाव कारने दिली धडक; ३५ वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू

**■ पुणे : विशेष प्रतिनिधी**

दिवाळीनिमित्त रस्त्यावर फटाके फोडणाऱ्या ३५ वर्षीय व्यक्तीला भरधाव कारने धडक दिली आहे. या भीषण अपघातात त्याचा बाजुला जाऊन पडला. या भीषण अपघातामुळे त्याच्या डोक्याचा जबर मार लागला. या अपघातानंतर स्थानिकांनी याची माहिती लगेच पोलिसांना दिली. तसेच त्याला तत्काळ




जागीच मृत्यू झाला आहे. १ नोव्हेंबर रोजी पुण्याच्या पिंपरी-चिंचवडमधील रावेत भागात ही घटना घडली. या घटनेचं सीसीटीव्ही फूटेज आता पुढे आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे अद्यापही पोलिसांनी आरोपींचा शोध न घेतल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जातो आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोहम पटेल असं मृत्यू झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री तो त्याच्या रावेत येथील फेलीसिटी सोसायटीसमोर फटाके फोडत होता. यावेळी रस्त्याने जाणाऱ्या भरधाव कारने त्याला जोरदार धडक दिली. त्यामुळे तो रस्त्याच्या जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत्यू घोषित केलं. दरम्यान, ४८ तास उलटूनही अद्याप पोलिसांनी वाहन चालकाला शोधून कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे आता नागरिकांकडून संताप व्यक्त केला आहे. पुण पोलिसांनी आरोपीला तत्काळ शोधून अटक करावी, तसेच त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जाते आहे. खरं तर मागच्या काही महिन्यात पुण्यातील हिट अँड रनची ही दुसरी घटना आहे. काही महिन्यांपूर्वी पोर्श गाडीने अशाचप्रकारे दोघांना धडक दिली होती.

# पुणे पोलिसांची अनोखी दिवाळी भेट; चोरीस गेलेले 'इतके' मोबाइल फोन नागरिकांना केले परत

**■ पुणे : विशेष प्रतिनिधी**

सध्या पुण्यासह देशभरात दिवाळीचा उत्साह आहे. बाजारपेठ सजली आहे. नागरिक काहरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी करताना पाहायला मिळत आहे. पुण्याच्या तुळशीबाग, मंडई परिसरात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. दरम्यान या गर्दीत अनेकांचे मोबाइल फोन गहाळ झाले होते. मोबाइल हरवले होते. चोरीस गेले होते. ऐन दिवाळीत डेक्कन पोलिसांनी पुणेकरांना अनोखी भेट दिली असून, जिमखाना परिसरातून गहाळ, तसेच चोरीला गेलेल्या ३० मोबाइलचा शोध लावत ते मोबाईल पुन्हा परत दिले आहेत. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले आहेत. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांच्या हस्ते तक्रारदारांना परत करण्यात आले आहेत. गर्दीच्या ठिकाणांहून मोबाइल चोरी होणे, आणि




गहाळ होण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. मोबाइल गहाळ झाल्यानंतर परत मिळण्याची शाश्वती नसते. त्याहूनही या मोबाइलमध्ये असलेली माहिती आणि फोटो व्हिडीओ व क्रमांक यांचा गैरवापर होऊ नये अशी चिंता असते. मोबाइल चोरी, तसेच गहाळ झाल्याच्या तक्रारी डेक्कन पोलिसांकडे आल्या होत्या. पोलीस ठाण्यातील सायबर कक्षाकडून मोबाइलचा शोध घेण्याचे काम सुरू होते. वरिष्ठ निरीक्षक गिरीशा निंबाळकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रसाद राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी उमा पालवे, सरोजा देवर, सुप्रिया सोनवणे यांच्या पथकाने हरवलेल्या मोबइलची माहिती मिळवली व तांत्रिक तपास सुरू केला. हे मोबाइल राज्यातील वेगवेगळ्या भागांत वापरात असल्याचे समोर आले. त्यानुसार मोबाईलचा आयएमईआय क्रमांकावरून पोलिसांनी गहाळ झालेल्या ३० मोबाइलचा शोध घेतला. गहाळ झालेले मोबाइल वापरणाऱ्या नागरिकांशी संपर्क साधून मोबाइल त्वरित डेक्कन पोलीस ठाण्यात आणून देण्याच्या सूचना दिल्या.

# दारू पिऊन भांडण केल्याने पत्नीने थेट पतीचा प्रायव्हेट पार्ट कापला; दिल्लीमधील भयंकर घटना

**■ दिल्ली : विशेष प्रतिनिधी**

उत्तर दिल्लीमधील रुपनगर परिसरातून एक भयंकर घटना समोर आली आहे. पती-पत्नीमध्ये वाद झाल्याने पत्नीने रागाच्याभरात आपल्या पतीच्या प्रायव्हेट पार्टवर धारदार शस्त्राने हल्ला केला आहे. यामध्ये पती गंभीर जखमी असून सफदरजंग रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पत्नी फरार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १ नोव्हेंबर रोजी ही घटना घडली आहे. पोलिसांना या घटनेबाबत फोन आला होता. महिलेने केलेला प्रताप ऐकून पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच पीडित पतीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी या घटनेबाबत महिलेविरोधात तक्रार नोंदवून घेतली आहे. तसेच फरार पत्नीचा शोध सुरू आहे.

पतीने आपल्या तक्रारी दिलेल्या माहितीनुसार, ४०



वर्षीय पीडित पती ३८ वर्षीय पत्नीसह गेल्या तीन-चार महिन्यांपासून राहत होता. या दोघांचा हा तिसरा विवाह होता. पीडित पती शक्तीनगर येथील एका पीजीमध्ये हेल्पर म्हणून काम करतो. तो मूळचा बिहारच्या मधुबनी जिल्ह्यातील रहिवासी आहे.

३१ ऑक्टोबर रोजी पती दारू पिऊन घरी आला. त्यानंतर पत्नी बरोबर एका गोष्टीवरून त्यांच्यात वाद झाला. पती-पत्नी मधील वाद जास्त विकोपाला गेला. त्यानंतर रागावलेल्या पत्नीने घर सोडून जाण्याचा निर्णय घेतला. ती घरातून बाहेर निघाली. त्यानंतर काही वेळाने पती झोपून गेला. पती झोपलेला असताना पत्नी पुन्हा एकदा घरी आली. तसेच रात्री तिने पतीच्या गुप्तांगावर हल्ला केला. यामध्ये तो प्रचंड जखमी झाला.


पीडित पतीवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्याची प्रकृती आता स्थिर आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. तसेच फरार पत्नीचा शोध सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.

# टोपीवरून झालेल्या वादातून तरुणाची गोळ्या झाडून हत्या; आरोपीच्या आईने पुरवली बंदूक

**■ नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी**

दिल्लीमधील शाहदरा जिल्ह्यातील गांधी नगरमध्ये एका २० वर्षीय मुलाची त्याच्या मित्रांनीच गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आहे. तसेच हा गुन्हा करणाऱ्यांना आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तसेच या प्रकरणात आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे, याची माहितीही दिल्ली पोलिसांकडून घेण्यात येत आहे.

दिल्लीमधील शाहदरा या परिसरात शनिवारी मित्रा मित्रांमध्ये किरकोळ वाद झाला आणि या वादाचे रुपांतर मोठ्या भांडणात झालं. यामध्ये तीन अल्पवयीन मुलांनी एका १९ वर्षीय तरुणाची गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना शनिवारी घडली. पोलिसांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की, सुफियान आणि आरोपी यांच्यात टोपीवरून वाद झाला. सुफियान




याने दोन अल्पवयीन मुलांना चापट मारली. मात्र, त्यानंतर त्या दोघांनी त्याच्या हत्येचा कट रचला, अशी माहिती एका अधिकाऱ्यांनी दिली. यासंदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. दरम्यान, या घटनेनंतर गांधी नगर पोलीस ठाण्यात गोळीबाराची तक्रार करण्यासाठी पोलिसांना एक फोन आला. त्यानंतर तातडीने पथके घटनास्थळी रवाना करण्यात आली. या गोळीबाराच्या घटनेत सुफियान नावाच्या तरुणावर गोळीबार करण्यात आला होता. यामध्ये तो तरुण गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर त्याला ताबडतोब रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. या प्रकरणात दिल्ली पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच या प्रकरणात दिल्ली आणि गाझियाबादमधील वेगवेगळ्या ठिकाणांहून तीन अल्पवयीन आरोपींना अटक केली आहे. तसेच पोलीस आणखी एका संशयिताचा आणि एका आरोपीच्या आईचाही शोध घेत आहेत.

## बेवारस मृतदेह

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक ८४/२०२४, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये अनोळखी बेवारस मयत इसम नामे गौतम कावा दामोरे, वय अंदाजे- ३५ वर्षे, बांधा- सडपातळ, असलेला इसम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून नमूद




इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे. तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क-**
**श्री.अजिनाथ फुंदे, पोलीस उपनिरीक्षक**
**वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ९६८९८५८०४८**
**पोलीस ठाणे क्रमांक :**
**०२२२६४२३१२२**

# दागिन्यांच्या चोरी प्रकरणी मोलकरीण पोलिसांच्या ताब्यात

**■ मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मोलकरणीने घरातील तब्बल पावणेतीन लाख रुपये किमतीच्या हिरे आणि सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना बुधवारी घाटकोपर परिसरात घडली. पंतनगर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून सदर महिलेला ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. घाटकोपरच्या हिंगवाला लेन परिसरात वास्तव्यास असलेले गौरव बोटारा यांच्या घरात मोलकरणीनेच चोरी केल्याचे निष्पन्न झाले. दिवाळीनिमित्त




गौरव यांच्या पत्नीला दागिने घालायचे होते. त्या मंगळवारी सायंकाळी घरातील कपाटात ठेवलेले दागिने काढण्यासाठी गेल्या. मात्र कपाटातील दागिन्यांचा डब्बाच गायब झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. डब्यात हिऱ्याचे आणि सोन्याचे सुमारे पावणेतीन लाख रुपये किंमतीचे दागिने होते. त्यांनी घरात दागिन्यांचा शोध घेतला. मात्र दागिने कुठेच सापडले नाहीत. गौरव यांच्या घरी अनेक वर्षापासून एक महिला घरकाम करण्यासाठी येत होती. तिने ही चोरी केल्याचा संशय होता. त्यामुळे त्यांनी तिच्याकडे विचारपूस केली. मात्र ती समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. अखेर गौरव यांनी बुधवारी पंतनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी सदर मोलकरणीला गुरुवारी ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# महिलेची हत्या करून मृतदेह 'व्हिआयपी' परिसरात पुरलाः चार महिन्यांनी 'असं' उलगडलं घटनेचं रहस्य

**■ कानपूर : विशेष प्रतिनिधी**

बॉलीवूड चित्रपट 'दृश्यम' मध्ये दाखवलेल्या कथेप्रमाणे एक धक्कादायक घटना कानपूरमध्ये घडल्याची माहिती समोर आली आहे. एक महिला चार महिन्यांपासून बेपत्ता झाली होती. या महिलेचा तपास पोलीस तब्बल चार महिन्यांपासून करत होते. मात्र, तपास लागत नव्हता. या घटनेतील आरोपी देखील फरार होता. आरोपीचा शोध पोलिसांकडून सुरु होता. पण आरोपी पकडण्यात यश येत नव्हते. अखेर या संपूर्ण प्रकरणाचा आता थेट चार महिन्यांनी उलगडा झाला आहे.

चार महिन्यांपूर्वी एका व्यावसायिकाच्या पत्नीची हत्या करून तिचा मृतदेह कानपूरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या बंगल्याशेजारी असलेल्या एका 'व्हिआयपी' क्लबच्या आवारात पुरण्यात आल्याच्या आरोपाखाली एका जिम ट्रेनरला शनिवारी पोलिसांनी अटक केली. हा आरोपी जूनपासून फरार होता आणि पंजाबमध्ये तो एका हॉटेलमध्ये काम करत होता. या आरोपीचं नाव विमल सोनी (३५) असं असून याला पोलिसांनी अटक केलं आहे. त्यानंतर पोलिसांनी ३२ वर्षीय पीडितेचा मृतदेह बाहेर काढला आहे. या धक्कादायक घटनेच गूढ उकललं



आहे. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. दरम्यान, या घटनेची माहिती देताना पोलिसांनी सांगितलं की, ती महिला शेवटची २४ जून रोजी जिममध्ये गेली होती आणि तेव्हापासून बेपत्ता झाली होती. या प्रकरणी तिच्या पतीने विमल सोनी याच्या विरोधात एफआयआर दाखल केला होता. या प्रकरणासंदर्भातील माहिती देताना डीसीपी श्रवण कुमार यांनी सांगितलं की, 'आरोपी विमल याला शोधण्यात पोलिसांना अडचण आली. कारण तो त्याचा फोन वापरत नव्हता किंवा तो कोणताही आर्थिक व्यवहार करत नव्हता. काही दिवसांपूर्वी आरोपीने त्याच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला आणि त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्याला अटक केली.' 'आरोपीच्या तपासासाठी अनेक टीम दिल्ली, पुणे, आग्रा, ग्वाल्हेर आणि पंजाब येथे पाठवण्यात आल्या होत्या. मात्र, असे आढळून आले की आरोपी काही काळ पंजाबला गेला, जेथे त्याने हॉटेलमध्ये काम केलं. त्याने हॉटेलचे मालक आणि कर्मचाऱ्यांशी कमीत कमी संवाद साधला. काही दिवसांपूर्वी त्याने कानपूरमधील त्याच्या कुटुंबाशी संपर्क साधला. त्यानंतर आम्ही त्याचे लोकेशन ट्रेस केले आणि त्याला अटक केली', अशी माहिती डीसीपी श्रवण कुमार यांनी दिली.

# ‘भाजपा अमित ठाकरेंचाच प्रचार करणार’, प्रसाद लाडांकडून भूमिका स्पष्ट; म्हणाले, ‘सरवणकरांना विधान परिषदेवर...’

■ मुंबई : राकेश गायकवाड

माहीम विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीवरून महायुतीमधील वातावरण तापलं आहे. शिवसेनेने (एकनाथ शिंदे) येथून विद्यमान आमदार सदा सरवणकर यांना उमेदवारी दिली आहे. तर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहीममधून विधानसभेचं तिकीट दिलं आहे. अमित ठाकरे यांना निवडून आणण्यासाठी मनसेने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्याचबरोबर भाजपाचीही त्यांना साथ मिळत आहे. त्यामुळे सदा सरवणकरांनी त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घ्यावा यासाठी मनसे व भाजपा शिवसेनेवर (शिंदे) दबाव निर्माण करत आहेत. मात्र सरवणकर व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपा-मनसेच्या दबावाला जुमानलेलं नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना त्यांचा पूर्ण पाठिंबा असल्याचं जाहीर केलं. त्यानंतर सदा सरवणकर यांनी आता थेट राज ठाकरे यांची भेट घेणार असल्याचे जाहीर केलं आहे. दुसऱ्या बाजूला, मनसे नेते व माजी आमदार नितीन सरदेसाई यांनी आज भाजपा आमदार प्रसाद लाड यांची भेट घेतली. या भेटीनंतर लाड यांनी माहीम विधानसभेबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे. आमदार लाड म्हणाले, अमित ठाकरे हा आमच्या कुटुंबातील मुलगा पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहे. अमित ठाकरे राज ठाकरेंचा मुलगा असला तरी आम्ही त्याला आमच्या मुलासारखाच समजतो आणि या निवडणुकीत आम्ही राज ठाकरे यांना मदत करावी यावर ठाम आहोत. सदा सरवणकर हे शिवसेनेचे (शिंदे) ज्येष्ठ नेते आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांची समजूत काढतील अशी आम्हाला अपेक्षा आहे. विधानसभेवरील आमदार असो, अथवा विधान परिषदेवरील आमदार असो, शेवटी आमदार हा आमदारच असतो. सदा सरवणकर हे कित्येक वेळा जनतेतून निवडून विधानसभेवर गेले आहेत. यावेळी त्यांना विधान



परिषदेवर पाठवून त्यांची समजूत काढता येईल. एकनाथ शिंदे यांनी त्यांची समजूत काढून त्यांना विधान परिषदेवर संधी द्यायला हवी. यासह त्यांच्याकडे श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचं अध्यक्षपद पाच वर्षासाठी देण्यात आलं आहे.

तसेच त्यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे मला वाटतंय की सरवणकर या सगळ्या गोष्टींचा विचार करून आमची भूमिका मान्य करतील. भाजपाची भूमिका स्पष्ट आहे, आम्ही या निवडणुकीत अमित ठाकरे यांचा प्रचार करणार आहोत.

एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना सदा सरवणकर म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार या तीनही नेत्यांनी मला आशीर्वाद दिला आहे. मी अर्ज भरल्यानंतर प्रचारही सुरू केला आहे. मी ज्या मतदारांसाठी गेल्या १५ वर्षांपासून काम करतोय तिथल्या जनतेवर माझा पूर्ण विश्वास आहे. माझ्यावर ते प्रेम करतात. ते मला विजय मिळवून देतील. मी सामान्य घरातील माणूस आहे.

# ‘१० दिवसांत राजीनामा द्या, अन्यथा बाबा सिद्दिकी यांच्यासारखा शेवट करू’; मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना धमकी

■ लखनऊ : वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना जीवे मारण्याची धमकी आल्याची माहिती समोर आली आहे. मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला धमकी देणारा अनोळखी क्रमांकावरून एक संदेश प्राप्त झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून पोलीस प्रशासन अलर्ट झालं आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरु करण्यात आला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी १० दिवसांत आपल्या पदाचा राजीनामा न दिल्यास राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते बाबा सिद्दिकी यांच्याप्रमाणे तुमचा शेवट करू, असा धमकीचा संदेश मुंबई पोलिसांना शनिवारी संध्याकाळी मिळाला आहे. मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला या धमकीचा संदेश एका अनोळखी क्रमांकावरून मिळाल्याची माहिती सांगितली जात आहे. दरम्यान, या धमकीचा संदेश कोणी पाठवला? यासंदर्भात पोलिसांकडून तातडीने तपासाला सुरुवात करण्यात आली आहे. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेने दिलं आहे.



उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना अनेकदा जीवे मारण्याच्या धमक्या याआधीही आल्या होत्या. त्यानंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणांहून धमक्या देणाऱ्यांना अटक करत कारवाई केली होती. मात्र, यानंतर आता मुंबई पोलिसांना योगी आदित्यनाथ यांना धमकी देण्यात आल्याचा संदेश आल्यामुळे पोलीस प्रशासन अलर्ट झालं आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी बाबा सिद्दिकी यांचा मुलगा झीशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाबाहेर १२ ऑक्टोबर रोजी दसऱ्याच्या दिवशी बाबा सिद्दिकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती.

# पहाडीमधील पंचतारांकित प्रकल्पातील विजेत्यांना फेब्रुवारी-मार्चमध्ये घरांचा ताबा; आतापर्यंत प्रकल्पाचे ९० टक्के काम पूर्ण

■ मुंबई : विशाल कारंडे

म्हाडाचे मुंबई मंडळ प्रथमच जलतरण तलाव, क्लब हाऊस आणि पोडीयम वाहनतळ आदी पंचतारांकित सुविधांचा समावेश असलेल्या ३९ मजली (पाच मजली पोडीयमसह) इमारतीची उभारणी करीत आहे. या प्रकल्पातील ३३२ घरांसाठी नुकतीच सोडत काढण्यात आली असून सोडतीमधील विजेत्यांना घराच्या ताब्यासाठी चार ते पाच महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे. आतापर्यंत या प्रकल्पाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून डिसेंबरमध्ये १०० टक्के काम पूर्ण करण्याचे मंडळाचे नियोजन आहे. त्यानंतर इमारतीस निवासी दाखला घेऊन विजेत्यांना घराचा ताबा देण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी फेब्रुवारी – मार्च २०२५ उजाडण्याची शक्यता आहे. गोरेगावमधील पहाडी परिसरात मुंबई मंडळाने अंदाजे ८ हजार घरांचा प्रकल्प हाती घेतला होता. या प्रकल्पातील अत्यल्प, अल्प गटांतील २,६८३ घरांचे काम पूर्ण करण्यात आले आणि या घरांसाठी २०२३ मध्येच सोडत काढण्यात आली.



तर दुसऱ्या टप्प्यात मध्यम आणि उच्च गटांतील ३३२ घरांचे बांधकाम सुरू आहे. या निर्माणाधीन प्रकल्पातील घरांचा मंडळाने ऑक्टोबर २०२४ च्या सोडतीत समावेश केला होता. सोडतीसाठी पुरेशी घरे नव्हती. म्हणून मंडळाने या घरांचा सोडतीत समावेश केला आणि ३३२ घरांसाठी ८ ऑक्टोबर रोजी सोडत काढली. म्हाडाने गोरेगावसारख्या ठिकाणी पहिल्यांदाच पंचतारांकित इमारतीतील उच्च आणि मध्यम गटातील घरे उपलब्ध करून दिल्याने सोडतीत या घरांना चांगला प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने या घरांसाठी अर्ज सादर झाले होते. म्हाडाने पहिल्यांदाच पहाडी येथे ३९ मजली इमारत बांधली असून प्रथमच पोडीयम वाहनतळ, जलतरण तलाव, योग केंद्र, क्लब हाऊस अशा पंचतारांकित सुविधा उपलब्ध केल्या आहेत. खासगी विकसकप्रमाणे म्हाडाच्या प्रकल्पात सुविधा मिळत असल्याने आणि परवडणाऱ्या किंमतीत या प्रकल्पात घरे उपलब्ध होत असल्याने त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला होता.

# बारामतीची लढाई सोपी राहिलेली नाही: संजय राऊतांचा अजित पवार, नवाब मलिकांना टोला

■ मुंबई : सम्यक कासारे

विधानसभा निवडणुकीसाठीचे उमेदवारी अर्ज मागे घेण्याची उद्या शेवटची तारीख आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत अनेक जागांवर बंडखोरी झाली आहे. महायुतीतील तिन्ही पक्षांनी अनेक जागांवर उमेदवार दिले आहेत. त्यातीलच एक मतदारसंघ शिवाजीनगर – मानखुर्द हा आहे. येथे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने नवाब मलिक यांना पक्षाची अधिकृत उमेदवारी दिली आहे. नवाब मलिक यांनी प्रचाराला सुरुवात केली असून अजित पवार हे या निवडणुकीत किंगमेकर ठरतील असे वक्तव्य केले आहे. त्यावर संजय राऊत म्हणाले की, बारामतीची लढाईच आता अजित पवारांसाठी सोपी राहिलेली नाही. या निवडणुकीत किंग आणि किंगमेकर कोण होणार हे उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच ठरवेल असा टोला लगावला आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते.

शिवसेना (उद्धव ठाकरे) नेते आणि राज्यसभा सदस्य संजय राऊत यांना नबाव मलिकांनी केलेल्या दाव्यासंबंधी प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, ‘२६ नोव्हेंबरला महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झालेले आपण पाहाल. त्यामुळे कोण- काय बोलतं? कुणाचे काय दावे आहेत? याला काही महत्त्व नाही.’ राऊतांनी नवाब मलिक यांचे नाव न घेता म्हटले की, ‘त्यांना म्हणावं आधी आपण जिंकून या. अजित पवारांसह सगळ्यांना माझं सांगणं आहे की आधी आपण जिंकून या. बारामतीची लढाई आता सोपी राहिलेली नाही.’




अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचा प्रमुख घटक पक्ष आहे. यंदा निकालानंतर कोण कोणासोबत आघाडी आणि युती करणार याचा अंदाज बांधणे कठीण आहे. त्यामुळेच नवाब मलिक यांचे वक्तव्य महत्त्वाचे आहे. ते म्हणाले की, अजित पवार हे निकालानंतर किंगमेकर ठरतील. त्यावरुन संजय राऊतांनी त्यांना टोला लगावला आहे की, आधी तुम्ही जिंकून या. आणि त्यांचे नेते अजित पवार यांच्यासाठीही यंदा बारामतीची निवडणूक सोपी नाही, असेही राऊत म्हणाले. बारामतीमध्ये शरद पवारांची राष्ट्रवादी विरुद्ध अजित पवार असा थेट सामना आहे. लोकसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पत्नीचा पराभव झाला होता. बारामती विधानसभेतून शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना ४८ हजारांहून अधिक मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे अजित पवारांसाठी ही निवडणूक यावेळी सोपी नाही, असे राऊत म्हणाले. शिवाजीनगर मानखुर्द मतदारसंघात महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही प्रमुख आघाड्यांकडून बंडखोरी झाली आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) यांनी येथे राजेंद्र वाघमारे यांनी उमेदवारी दिली आहे. तर महाविकास आघाडीमधील घटक पक्ष असलेले आबू आझमी यांनी समाजवादी पार्टीकडून अर्ज दाखल केला आहे. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांनी अर्ज दाखल केला आहे. दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे सुरेश पाटील यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

# जुन्या इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, अरुंद रस्ते कुठे आहेत हे प्रश्न!

■ पुणे : अभिजीत येरल्लू

रस्त्यांची दुरवस्था, कॅन्टोन्मेंट भागातील जुन्या इमारतींचा रखडलेला पुनर्विकासाचा प्रश्न, अरुंद रस्त्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी अशा समस्या पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना भेडसावत आहेत. गेल्या काही वर्षांपासून हे प्रश्न प्रलंबित असून, वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही त्यावर तोडगा निघत नसल्याने या भागातील नागरिकांमध्ये नाराजी आहे. या मतदारसंघातील काही भागांत मोठ्या झोपडपट्ट्या असून, काही भाग उच्चभ्रूंचा आहे. ताडीवाला रस्ता, मंगळवार पेठ, सोमवार पेठ, कोरेगाव पार्क, डायस प्लॉट, काशेवाडी, हरकानगर, मोदी खाना, भीमपुरा, कॅम्प परिसर, सोलापूर बाजार, गुलटेकडी, घोरपडी, वानवडी, तसेच बी. टी. कवडे रस्त्याचा काही भाग कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात येतो. रोजंदारीवर काम करणारे, मध्यमवर्गीय याचबरोबर व्यावसायिक, उद्योजक, तसेच वरिष्ठ पातळीवर काम करणारे अधिकारीही या मतदारसंघातील कोरगाव पार्क परिसरात राहतात. कटक मंडळांचा समावेश महापालिकेच्या हद्दीत करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला. मात्र अद्यापही त्यावर शिक्कामोर्तब न झाल्याने हा भाग पालिकेच्या हद्दीत कधी जाणार, हे स्पष्ट झालेले नाही. कटक मंडळाच्या हद्दीत अनेक जुन्या इमारती असून, अनेक इमारती मोडकळीस आल्याने अक्षरश: धोकादायक बनलेल्या आहेत. मात्र, त्याचा पुनर्विकास करायचा झाल्यास त्यासाठी संरक्षण खात्याची मान्याता लागते. ही प्रक्रिया अत्यंत किचकट असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबितच




राहिलेला आहे. या मतदारसंघात जुन्या झालेल्या सांडपाणी वाहिन्या, रस्त्यांची दुरवस्था, अरुंद रस्त्यांमुळे कॅम्प भागात होत असलेली वाहतुकीची कोंडी, याबरोबरच अपुरी पार्किंग व्यवस्था असे प्रश्न आहेत. या मतदारसंघात सर्वधर्मीय नागरिक आहेत. मुस्लीम, दलित, ख्रिश्चन समाजाचे लक्षणीय मतदार या मतदारसंघात आहेत. एका बाजूला उच्चभ्रूंची लोकवस्ती तर एका बाजूला झोपडपट्टीत येणारा भाग, असे चित्र येथे पाहायला मिळते. कटक मंडळ सदस्यांची निवडणूक रखडल्याने पाठपुरावा करायचा, तर कोणाकडे, असा प्रश्न येथील नागरिकांकडून विचारला जात आहे.

# ‘क्षयरोग मुक्त भारत’ अंतर्गत राज्यात १२ लाखांपेक्षा अधिक नागरिकांना लसीकरण मुंबई अद्याप लसीकरणाला सुरुवात नाही

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

‘क्षयरोग मुक्त भारत’ या अभियानांतर्गत राज्यामध्ये सप्टेंबरपासून नागरिकांचे बीसीजी लसीकरण करण्यास सुरूवात झाली आहे. लसीकरण मोहिमेला सुरुवात झाल्यापासून दोन महिन्यांमध्ये राज्यातील १२ लाख ३० हजार ३६२ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. मात्र मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेविका वारंवार आंदोलन करत असल्याने मुंबईमध्ये लसीकरण मोहिमेला अद्याप सुरुवात झालेली नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ पर्यंत ‘क्षयरोग मुक्त भारत’ करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार देशभरामध्ये क्षयरोगा विरोधात व्यापक मोहीम हाती घेण्यात आली असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये १८ वर्षांवरील प्रत्येक नागरिकांना बीसीजी लस देण्यात येत आहे. राज्यात ३ सप्टेंबर २०२४ रोजी सुरू झालेल्या या क्षयरोग विरोधी मोहिमेला राज्यातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील दोन महिन्यांमध्ये मुंबई वगळता राज्यातील १२ लाख ३० हजार ३६२ नागरिकांना बीसीजी लस देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक २ लाख ७ हजार ७९५ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. त्याखालोखाल सांगली ग्रामीण भागामध्ये १ लाख १० हजार ९१९ नागरिक, धुळयामध्ये ९० हजार ६५७ आणि पुण्यामध्ये ७० हजार २७७ नागरिकांना बीसीजी लस देण्यात आली आहे. ‘क्षयरोग मुक्त भारत’ या अभियानांतर्गत बीसीजी लस देण्यात येणाऱ्या नागरिकांची पुढील तीन वर्षे नियमित तपासणी करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिक आणि आजारी रुग्णांचा क्षयरोगापासून बचाव करणे आणि लशीचा ज्येष्ठ



नागरिकांवर किती परिणाम होतो ते तपासणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असल्याची माहिती राज्य क्षयरोग निर्मूलन विभागातील अधिकाऱ्याने दिली. मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रभागांमध्ये नागरिकांना बीसीजी लस देण्यात येणार आहे. मात्र मुंबईतील आरोग्य सेविका वारंवार आंदोलन करत असल्याने क्षयरोगाच्या सर्वेक्षणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे मुंबईमध्ये लसीकरण मोहिमेला सुरुवात झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेने १८ वर्षांवरील सहा अति जोखीम असलेल्या गटांची निवड केली आहे.

# खोडा घालणाऱ्यांना जोडे दाखवा, मुख्यमंत्र्यांनी कुर्ल्यात फोडला प्रचाराचा नारळ

■ मुंबई : गणेश बागडे

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४साठी सर्व पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज भरून झाल्यानंतर आता प्रचाराची लगबग सुरू केली आहे. सोमवार, ४ नोव्हेंबर हा अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असतानाच रविवारी (३ नोव्हेंबर) भाऊबिजेचे निमित्त साधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या प्रचाराचा नारळ कुर्ल्यात फोडला आहे. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार मंगेश कुडाळकर यांच्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. ते म्हणाले, ‘लाडकी बहीण योजनेत खोडा घालणाऱ्यांना जोडे दाखवा.’

भाऊबिजेच्या शुभेच्छा देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ‘माझ्या लाडक्या बहिणींना एकच सांगतो, आता तुम्हाला फक्त वर्षाला ओवाळणी नव्हे तर दर महिन्याला भाऊबीज मिळणार आहे. हा माहेरचा आहेर दरवर्षी तुम्हाला मिळणार आहे. हे विरोधी पक्षातील लोकांनी लाडकी बहीण योजना बंद व्हावी, म्हणून प्रयत्न करत आहेत. त्यांनी यासाठी न्यायालयाचे दारदेखील ठोठावले पण तिथेही त्यांना चपराक मिळाली. ‘तुम्ही



महिलांना लालूच दाखवता, भीक देता? या लाडक्या बहीण योजनेच्या नावाखाली तुम्ही त्यांची मते विकत घेता,’ असे आरोप केले. यांना तुम्ही उत्तर कसे द्याल. जे लोकं या योजनेत खोडे घालत आहेत, त्यांना तुम्ही जोडे दाखवा.’ असे म्हणत विरोधकांना टोला लगावला. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार मंगेश कुडाळकर यांच्याबद्दल बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ‘मंगेश कुडाळकर हे शिवसेनेचे ओपनिंग बॅट्समॅन ठरले आहेत. आता चौकार आणि षटकार मारत समोरच्याचे डिपॉझिट जप्त करायचे आहे.’ असे म्हणत त्यांनी कुर्लावासियांना मंगेश कुडाळकर यांना ५० हजार मताधिक्याने निवडून द्यायचे आवाहन केले. ‘काही ठिकाणी लवंग्या फुटत आहेत. पण, २३ नोव्हेंबरला आपला महायुतीचा ॲटम बॉम्ब फुटणार आहे.’ असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ‘आम्ही लोकांना फसवणार नाही. आम्हाला बाळसाहेब ठाकरे यांची शिकवण आहे. आम्ही लोकांमध्ये जाऊन काम करतो, फक्त फेसबुक लाईव्ह करत नाही,’ असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुर्ल्यात प्रचार सभेचा नारळ फोडला.

# २५ टक्के जागांवर काँग्रेस आणि भाजपात वर्चस्वाची लढाई

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

राज्यात सर्वत्रच विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडण्यात आला आहे. अनेक दिग्गज नेते पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. ज्यामुळे अनेक विधानसभा मतदारसंघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. सर्वांचे लक्ष शिवसेना वि. शिवसेना किंवा राष्ट्रवादी वि. राष्ट्रवादी या जागांकडे असतानाच आता महाराष्ट्रातील काही जागांवर भाजपा वि. काँग्रेस या दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळणार आहे. राज्यातील एकूण २८८ विधानसभांपैकी तब्बल ७४ मतदारसंघांमध्ये या दोन राष्ट्रीय पक्षाच्या उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. त्यामुळे २५ टक्के जागांवर दोन राष्ट्रीय पक्षांमधील झुंज पाहायला मिळणार आहे. राज्यातील यंदाची विधानसभा निवडणूक ही अत्यंत चुरशीची आणि प्रतिष्ठेची होणार आहे. कारण एका बाजूला महायुतीत भाजपा या राष्ट्रीय पक्षासोबत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) आहे. तर दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीत काँग्रेस या राष्ट्रीय पक्षासोबत सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) आहे. त्यामुळे सगळ्यांचेच लक्ष सेना किंवा राष्ट्रवादी या दोन्ही गटागटांमध्ये होणाऱ्या लढतींकडे



लागले आहे. परंतु, भाजपाचे अनेक दिग्गज नेते हे काँग्रेस उमेदवाराविरोधात किंवा काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते हे भाजपा उमेदवाराविरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. ज्यामुळे या लढती देखील अटीतटीच्या होणार आहेत. राष्ट्रीय पक्ष असलेल्या भाजपा आणि काँग्रेसने जाहीर केल्यानुसार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सुधीर मुनगंटीवार, डॉ. विजयकुमार गावित, संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. संजय कुटे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, माजी मंत्री मदन येरावार, अशोक उईके यांची लढत काँग्रेसच्या उमेदवारासोबत होणार आहे. तर, भाजपविरोधात लढत असलेल्या काँग्रेस नेत्यांमध्ये प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री नितीन राऊत, माजी मंत्री अस्लम शेख यांसारख्या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. तर अन्यही काही अशा जागा आहेत, जिथे भाजपा वि.काँग्रेस असा सामना पाहायला मिळणार आहे. त्यामुळे या ७४ जागांपैकी किती जागांवर भाजपा आणि जागांवर काँग्रेस विजयी होते, हे पाहमे महत्त्वाचे ठपरणार आहे.